दरबारांत बहाणा दिसल्यावर बखेडा होतो, हें वर्तमान राजश्री फत्तेसिंग बाबास सांगोन बंदोबस्त करावयाचा तो केला पाहिजे. मामलत दुसरीकडे न जाये तें करणें. याचें उत्तर सत्वर पाठवणें. छ १७ रावळ बहुत काये लिहिणें. हे विनंती. मोर्तब सुद.

(18) It is a supplementary letter to Vishwanathbhat Vaidya about securing the Mamlat of Karnatak.

No. 19 श्री छ. १७ रबिलावल
चैत्र व. ४ १६६८
मार्च २९,१७४६

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान ता। मोकादम मौजे कान्हाटी प्रा सुपे सुा सबा आर्बैन मयाव अलफ. सन खमसांत चिरंजीव सौ बयाबाईचे लग्न जाहालें, ते समई सामान वगैरे मौजे मजकुराकडे रु. २५ पंचवीस करार केले. ते अद्याप वसूल दिल्हे नाहीं. हे गोष्ट कार्याची न केली. हालीं देखत आज्ञापत्र सदरहू रकम घेऊन पुण्यास येणें. जाणिजे छ १७ रबिलावल.

(19) It seems that Bayabai, the daughter of Chimnaji Appa was married in Magh or Phalgun of Shaka 1667 with Gangadhar Naik Onkar. The Mokadam of Karhati was to supply some things for it, which he did not do. He was therefore called to Poona with the money without delay.

No. 20 श्री २० रावल सीत आर्बैन
चैत्र वद्य ७।१६६८
एप्रिल १,१७४६

तुळोजीचा शिक्का व
मोर्तब वाटोळा
दुहेरी

आज्ञापत्र राजश्री कान्होजी राजे सिर्के तहा मोकदमासी ता। सावर्डे मामले हमदाबाद सुभा प्रांत दाभोळ सुा सीत आर्बैन मया अलफ रा। माहादाजी रघुनाथ व लक्षुमण विठ्ठल व तुको विठल देशकुलकर्णी गांवकुलकर्णी ता। मार यांणीं हुजूर येऊन विदित केलें कीं, ता। मारचे देशकुलकर्णी व गांवकुलकर्णी दोन्हीं वतनें पुरातन आपलीं आहेत, आपले वडील पुर्वापार चालवित आले आहेत, त्यांस शामळाच्या उपसर्गामुळें आपले वडील परागंदा होऊन

(Seal:) श्री
कान्होजी राजे
शिरके देशमु
ख सुभेदार स
मत दाभोळ

देशांत आले. त्यास या प्रांतीं रोजगार करून राहिले, त्यास महाराज राजश्री छत्रपती स्वामीनें शामळ परामवातें पाऊन मुलूख हस्तगत केला, त्यास साहेबी कृपाळू होऊन आपलें वतनें आपले दुमाला करून स्थापना करावी, म्हणोन विदित केलें, त्यावरून मनास आणून पेशजीच्या सनदापत्रें थोरले माहाराज राजश्री छत्रपती कैलासवासी स्वामीची व आमलाकडील महाराजांची व राजश्री पंतप्रतिनिधी यांचीं पाहोन यांचीं वतने यांचे दुमाला करून हें आज्ञापत्र सादर केलें असे. सदरहू वतनांस हकलाजिमा बा। माजी सनद थोरले माहाराज राजश्री स्वामीचे कारकीर्दीचे पाहोन करार करून दिल्हा असे बी तपसील.

हक गावगना दरसदे लारी दाभोळी
२॥ अडीच प्रमाणें कलम १
रकम गावगना इनामती
१४१ कोंकणांतील गाव ४१, दर गावास रकम लारी ३ तीन प्रमाणें येकूण लारी.
३२ मुरेंगांव ता। बिलेलाबाद गाव ८, दरगावास टके ४ च्यार, येकून टके.
———
१७३

इनामती
१ इनाम गांव मौजे तळसर
५ ठिकाणांतील गावगना
१ कोडवाईगवला कसबा सावर्डे
१ मौजे डेरवण ता। मार चोडेपटिया २ दोन, यां। ठिकाण येक
१ मौजे नांदगाव सेतरेव व माणखरी ठिकाण येक.
१ मौजे आर्वाटगाव आंबे फणस व नारळ झाडें बाग ठिकाण येक
१ मौजे खेरसेतपैकीं सेतमाडप ठिकाण येक
———
६

कानुकानुनाती

गोलीयाचे म्हैसीस तूप तानी व पारढी उनाला पावसाला तूप वजन ००२ दोन सेर कलम १
खुमखुमारीयाचे दुकानास घरास साळिना लारी ॥· निम कलम १
उसाच्या फडास हक
१ घाणियासी दररोज उंस ५ पांच प्रा। कलम येक.
१ गुळाचे काइलीस गूळ दररोज ००५ पांच सेर कलम येक.
———
२
३

कोष्टी व साळी मागास साहाळिना पाटकें १ येक येकून कलम १
सणगराच्या मागास साळिना कांबळा १ येक येकून कलम १
तेलियाच्या घाणियासी व दुकानास साळिना तेल वजन ००२॥ आडिच सेर कलम १
पानारियाच्या नगास पानें सुमारें १०० येकसे येकून कलम १
कापड नगास जकाती। लारी दाभोळी १ यां। कलम १

रंगारियाच्या दुकानास बाकिना कोणी किनखाब दरवैकास कारी
  काहरी १ येक येकून कलम १ ।· पाईण प्रमाणें कलम १
भुसाचे गोणीस दर बेलास रुके ८२ खंड व गुन्हेगारी
दोन प्रा कलम १ दरसदे काहारी दामोळी ५ पांच
दुकानास साकिना कारी १ येक प्रमाणें कलम १
  प्रो कलम १

येणेंप्रमाणें हक व इनाम गाव व मिकाणाती व रकम व इनाम गावगना व कानुकानुनाती पुरातन सनद प्रमाणें करार करून दिली असे. तरी याचे पुत्रपौत्रादि वंशपपरंरेनें चालवीत जाणें. जाणिजे छ २० रावल (मोर्तब सुद).

(20) This is an order to Mokadum of Sawarde of Hamudabad district to execute the conditions of Sanad granted by Raja Shahu for the enjoyment of certain rights of the ancient Vatan of the villages to Khandakars.

No. 21 श्री छ ५ जावल
जेष्ट शुा ६।१६६८
मे १५,१७४६

हिसेब जाहिमानगाकिडे खर्च सनगे वाडा १ छ ५ जावल सन सीत

सौ. बाई, अंबिकाबाई, गोदूबाई, गजराबाई, लक्ष्मीबाई, लाडूबाई अहिल्याबाई, उपाध्येबुवा, हरीबाई, द्रौपदीबाई, आपाई सिर्की, आपाई भाबयाई, कुसाई, जाधवयाची मूल, मोघम दिल्ही, शिवाजी हरी, बळवंतराव, लखमाजी भो, आबाजी सखदेव, भिवजी कासुर्डे, सुरनिस, चिटणीस, फडनीस, माहादाजीपंत पा, असबादि हा

यादी पोषाख

राजश्री स्वामी	ताराआईसाहेब	सौ. बाई वाडा १
५ बादली	४ चांदणी	४ बादली
१ मंदील	१ पातळ	१ पातळ
१ चादर	१ चोळीखण	१ खण
१ जामेवर	१ किनखाप	१ किनखाप
१ पटका	१ शालजोडी	१ चादर
१ किनखाप		
५	४	४

५ निंबळी सदरहू प्रा
५ कुसुंबी सदरहू प्रो
५ चांदणी सदरहू प्रो
५ कलसपाकी सदरहू प्रो

२५

४ कुसुबी सदरहु प्रो
४ निवासी सदरहु प्रो
४ कलस पाकीस
सदरहु प्रो
४ बनासी सदरहु प्रो

५
सौ बाई वाडा २
सदरहु प्रो

किता पोशाख बायकांचे
सौ. गजराबाई सणगें ४ प्रा
सौ. अहिल्याबाई
सौ. बच्याबाई
सौ. चिमाबाई

---

१ देहनगी

(21) In the Daftar there are lists of persons, male and female related to Chhatrapati's family to whom clothes were offered in honour of the thread ceremony of Bhikambhat, Balambhat Vaidya's son. The lists contain the details of the clothes as to their number, kind and names. These lists are useful to those who want to know the relations of females with the Royal family. The details of the number and Kind of clothes are dropped.

No. 22 श्री

शनिवार सीत आर्बैन छ. ६ जावल
जेष्ठ शु. ७।१६६८
मे १६,१७४६

यादी आहेर व्रतबंध भिकाजी बलाळ सुा सीत आर्बैन छ २ जावल घरचा, दामले, गोविंदभट दाते, माहादाजी कमलाकर, बाळ जोसी, सिवाजी नारायेण, रा पंतप्रधान, वासुदेव जोसी, माहादाजी कृष्ण कानिटकर, केसो माहादेव, केसो हरी कानिटकर, पुरुषोत्तं भट सेवडे, धोंडो गोपाळ, निळो रघुनाथ, मुधोजी भो, कोन्हेर राम, उधोपंत गो, बाजीपंत, बाबूराव हरी, कान्हाटीकर.

छ ३ रोज, त्रिंबक हरी, नरसीभट फडके, माहादाजी कृष्ण, काणे बावधनकर माहादाजी गणेश, रा पंतसचीव, रा आबूराव, न्होबा ना, यादो गोपाळ, आपाजीराव गाडगीळ, बापूभट वैद्य, राघेराम केळकर, मातुश्री काळी, गोपाळभट नवाथे, रामाजी नाईक भिडे, रत्नपारखी, बाहिरोबा सेणवी, कृष्णाजी नाई(क) जोसी, विसाजी बळाळ जोग, गोविंदराव चिटणीस, दादोबा पुरंदरे, यशवंतराव पोतनीस, आपाजी बाबूराव, गणोबानाई(क) कोलटकर, रा राव प्रतिनिधी, यमाजीपंत, रा गोविंद नाई(क), केशवराव वकील, आपाजी हणमंत, रुद्राजीपंत पुरंदरे, राघोबा राजवाडे, भग नाईक पुरंदरे, बाळाजी शंकर, रंगोबा ना, रा राणोजीबावा भोसले, माणकोपंत, सौ बाईसाहेब वाडा थोरला, सिवाजी हरी, जगोबा नाई(क) गोडसे, केसोबा ना चितळे, खोडदकर कुलकर्णी, खोडदकर पा

छ. ४ रोज गुरुवार, मोरो माहादेव, सिवाजी साळोखी, तुकोराम (डिंगणकर), लक्षुमण नानाजी, बुर्गोजी भोईटे, मोरोपंत दामले, नारोपंत फडणीस, नारबा दिा राणोजी बादे, विसाजी आनंत जोग, त्र्यंबक मोरेश्वर प्रभू, रत्नाकरपंत, रा. पंत आमात्य, पुरुषोत्तम वैद्य नगरकर, रा सुमंत, सदासिवपंत वैद्य, सिदभट ठकार, रामाजी मिर्जे रुजु, निबांजी सोमवंसी, बऱ्हाणजी मोहिते, सदासिव ना लिमये, त्रिंबकराऊ धायेगुडे, रा मंत्री, माधवराव बाजीराव, यांचा दाईज आबाजी सखदेव.

छ ५ रोज जावल शुक्रवार जिवराव शिंदे, नरसी शामराज, गोपाळराम, विठोबा ना वाकडे, देवराव मेघःश्याम, सुलतानजी गाढवे, बाळाजी दादाजी फा सिवाजी मोहिते, विनाइक जोसी, रघुनाथभट झिंपरे.

छ ६ रोजी दताजीपंत वैद्य, महंमद सफी, नबाब, हरभट वैद्य, बाबदे (व) भट आठले, रा फत्तेसिंग, गोविंद प्रभू, तात्या देशपांडे प्रा पुणे, वाडा २, वासुदेवभट आठले, रा सरलस्कर.

(22) The persons who offered presents to Vaidyas at the time of the thread ceremoney of Bhikambhat, the eldest son of Balambhat, are stated in this list. They are men of Vaidya's thick acquaintance, near relatives and also influential officers, and sardars of the state. The number and Kind of clothes are dropped.

२१

श्रीशंकर वरद

No. 23

२६ जमादिलावल
जेष्ठ वद्य १३।१६६८
जून ५,१७४६

श्रीमंत राजश्री **बाळंभट बावा** व तथा राजश्री **विश्वनाथभट बावा** स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक **केसो हरी सावरकर** मुा **नागपूर** प्रांत **देवगड** पाणीद्वयें जोडून शिरसा नमस्कार, विनंति उपरी. येथील क्षेम ताा छ २६ माहे जमादिलावल जेष्ठ वदी त्रयोदशी भृगुवार परियंत स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें व प्रांत मजकूरचें व प्राा **भुगावचें** वर्तमान येथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री **रघोजीबाबा ज्येष्ठ वदी दशमी सोमवारीं नागपुरास** येऊन सुखरूप पोहोंचले, व श्रीमंत **राजश्रीपंत** व **विसाजीपंत** समस्त मंडलीसुधा सुखरूप आले. सेवेसी कलावें म्हणोन लिा आहे. वरकड प्राा **भुगावचें** वर्तमान तर राा **विठ्ठलपंत** गेले, त्यांहीं साकल्य सांगितलेंच असेल. **विठ्ठलपंतानीं** भुगांवचें कामकाज येथून जात तोंपर्यंत केलें. त्याचा हिसोब आम्हांस दाखविला नाहीं. आम्ही **नागपुरास** होतों, त्याजवल हिसोब मागत होतों; परंतु येकंदर दाखविला नाहीं. आम्हांजवळ बाकी काढून दिली. त्याप्रों बाकीची याददास्त घेतली आहे. बाकी वसूल कराविती. इस्तमालतीचे दिवस. याजकरितां च्यार दिवस तकूब करून प्राा मजकूरची इस्तमालत केली. कांहीं थोडीबहुत राहिली, तेही करतों. इस्तमालत जाहलियाउपर बाकीचें वसुलाचें काम चालीस लाऊन बाकी वसूल करून सेवेसी रवाना करून विठ्ठलंती आम्हांजवळ बाकी निस्तुक कांहाडून दिली. त्यापैकीं मौजे **जाखेगांव** येथील रुपये ३६ छतीस **मनाजी पांड्या** याचे मारिफातीनें वसूल घेऊन गेला आणि त्या छतीस रुपयाची हुजत दिली. आण आमचे हिसेबीं मजरा दिली नाहीं. मोकदम मजकुरास आम्हीं बाकीचा तगादा केला, त्याणें बहुत कजिया केला. राा **विसाजीपंत** दादा पावेतों त्याणें फिराद केली. त्यास **विठ्ठलपंतां**पासून छतीस रुपये घेऊन गांवास मजरा येत असें करावें. त्यामध्यें ज्याप्रों आपण आज्ञा करितील त्या प्रों वर्तणूक करून. वरकड **नागपूर**चे असाम्यांपैकीं यैवज यावा त्यामध्यें साल मजकूरचे यैवजी राा **आपाजीपंत** सुभेदार याजवळ दाजीनें जखून च्यारसे रुपयाची वरात घेतली होती. त्यापैकीं रुपये दीडसे आम्हाकडेस वसूल आले आहेत. यासिवाय दोन हजाराची वरात सुभेदाराकडून घेतली. त्या वसुलावर **संकराजीपंत** आहेत. बारा चोदासे रुपये वसूल जाहाले आहेत. तो संकराजीपंताचा जिमा आहे. त्यांहीं आठसे रुपयाची हुंडी करून रवाना केली होती, ते **हुंडी फिरली**. ज्याचे दुकानची हुंडी केली, त्याचे दिवाले निघाले. हुंडी फिरोन आली. त्याजवळ रुपियासहि जागा नाहीं. यैसें जाहालें. त्याउपरी सावकाराचे घरीं चौकी बसवून त्याची हुंडी त्यास देऊन रुपयाचा तगादा लाविला. त्यास बहुत हैराण केला. त्याउपरी चौघे भले लोक दरम्यानें येऊन

---

१ भागवडीचें, २ पूर्णपणें.

या बापूजी नारायेण व राजश्री विसाजीपंत दादा यांचे साक्षीनें चौधा सावकारांनीं हवाले घेतले. दोहो महिन्यांचा वायेदा केला आहे. दोहो महिन्याउपर हा येतील. यानंतर रामटेकचे हजार रुपये यावे, त्यापैकी रुा ७७४ सातसे चौऱ्याहातर विठ्ठलपंत घेऊन गेले. बाकी राहिले ते पंधरा दिवसीं वसूल येतील. वसूल जाहाल्यानंतर सेवेसी पोहोचतील. वरकड रुपया कोणी देत नाहीं. त्यास श्रीमंतही येथें आले आहेत. अशामध्यें स्वाम येथें आल्यास मनोदयाप्रों

२

पुरवणी स्वामीचे सेवेसी.

कितेक कामकाज होऊन येईल. प्रांत मजकूरचे आसाम्याचे रुपये व कर्जवामाचे रुपये आपण या प्रांतास आल्यासिवाय येत नाहींत. यासिवाये कामकाज कितेक प्रा चें आहे तेंही अवगत होऊन कार्येसिध होऊन येईल. वरकड ठाणें मजकुरीं २ सिंगे आहेत, ते सुखरूप आहेत व चिंतोपंता बराबर लस्करांत घोडीं होतीं. घोड्या ३ व तट्टू २ व तटाणी येक येकूण सा घोडीं येथें सुखरूप आम्हांजवळ आलीं व बंगालेयाहून घोडा येक, तट्टू येक येकूण दोन याप्रों दहा घोडीं सुखरूप आहेत. परंतु बंगालेयाहून घोडा आला तो प्राणमात्र घेऊन येथें आला. त्याचे बहुत हाल आहेत. त्यास कांहीं आवशेष मसाला चारितों व चाकरीस अंतर करीत नाहीं. महि(ना) दो महिन्यांहीं कांहीं ताजा होईल व घोड्या गंगी व चितोडी यैशा सभर आहेत. महिन्या पंधरा दिवसा पसवतील व सुमानजी येथें आम्हापासीं सुखरूप आहेत. त्याचे आईस आश्वासन दिलें पाहिजे. वरकड येथें घोड्यांस भुगांवीं दहापंधरा घोड्यांची पागा सचंतर नवी बांधिली. सेवेसी श्रुत होय. यानंतर आमचे घरचें सविस्तर वृत लिहोन सेवकास आनंदविलें पाहि(जे). सर्वस्वें सेवक पदरचे आहों. ज्याप्रों स्वामींनीं सेवकाचा अंगीकार केला त्याप्रों परिणाम लाविला पाहिजे. बहुत काये लिा. कृपा निरंतर करून संतोषाभिवृधी केली पाहिजे. हे विनंती.

हो रामचंद्रपंत दाजी व नारोपंत दाजीस सां नमस्कार, विनंती उपरी. लिा परिसोन कृपाभिवृधी करून सेवकाचा सांभाल सर्व प्रकारें केला पाहिजे. बहुत काये लिा. हे विनंती.

सेवेसी मोहन्याचे रामराम सर्व माणसांस राम सागणें हे विनंती.

(23) Keso Hari Sawarkar, Vaidyas' clerk working in Berar writes them from Nagpur much important information on the following points :— (1) Raghuji Bhosle arrived in Nagpur from Bengal expedition on 2–6–1746, with Visaji Govind and Konerpant. (2) Vithal Annaji before leaving for Satara did not give the proper accounts of the revenue collection of Bhugaon and the money yearly to be received (as असाम्या) from Nagpur. (3) Unsatisfactory condition of the horse that returned from Bengal. (4) A new building was erected at Bhugaon for lying the horses.

No. 24 श्री क्षय संवत्सर
आषाढ शु. १।१६६८
जून ८,१७४६

यैवज येणें निा रा पंतप्रधान चिठी गुा देवराव यैवज पेशकसी नांवें माहादेव नाा ताबवेकर रुा १५००० पैकीं मुा ह्या आषाढ सुा १ ताा कार्तिक सुा १ मुा माहे १६ नी येणें रुा ५०००.

सदरहू वसूल क्षय कार्तिक वद्य १ गुा माहादेव नाा तांबवेकर रुा ५०००. बाकी०

आदेसुद निा

गोविंदराम खांडेकर

३८८८ यैन चिठी माणकोजी नाा पाठक याजवर दिली आषाढ सुध १३ नांवें मानिले

१११२ व्याज ह्या ताा मुा माहे १५ रोज १८ याो दर सदे. रुा २ प्राो रुपये १२१३८– वजा बारोत्रा रुा १०१८– बाकी

५०००

देणें गोविंदराम खांडेकर. हा यैवज पेशवेपैकीं दरसदे रुा ।-। प्राो याो व्याज १११२ पैकीं अठवा हिसा देणें रुा १३९ वजा व्याज मुा १५८१८ दर २ प्राो रुा ४४८– वजा बारोत्रा ३।।।– बाकी रुा ४०।·

बाकी देणें रुा ९८।।।·

२५ आषाढ गुा तोरापा माा रामचंद्र गोपाळ

(24) This is an account showing a mention of Rs. 15000/–paid by Vaidyas to the Peshwa, Nanasaheb.

No. 25 श्री आषाढ शु. ३।१६६८
जून ११,१७४६

राजश्री सरदार व सिलेदार व पागा व ठाणेदार व चौकीदार व राहादारांनी व मोकदम गोसावी यांसी.

।। छ अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्ये श्राो आवजी कवडे दिाा राजश्री

श्री ० / मल्लारी च / रणी तत्पर / आवजी कवडे / निरंतर

पंतप्रधान ठाणें पाा उमरखेड रामराम. सुा समान अर्बैन मया अलफ सन हजर ११५६. राजश्री हरी कृष्ण नोकर सरकार याचा कबिला उमरखेडास होता तो देसी पुणियासी रवाना केला आहे. बरोबर कारो अनंत यासी वगैर बितपसील.

१ घोडी तीन　　२ बैल दोन　　२ घटकी दोन
६ चाकर साह　　३ खासा नारोपंत वगैरे

सदरहू प्रो बरोबर देऊन रवाना केले आहेत. अहद उमरखेड तहद पुणें मार्गी कोणी दुजाईम न होणें. जेथें राहातील तेथें जागा व चौकी पाहाऱ्यास माणसें व बरोबर हजऱ्या देऊन आपली सरद पार करून देणें. रा छ २ जमादिलाखर.

(मोर्तब सुद)

दुजाईम = शत्रुत्व.

(25) This is a permit given by Awaji Kavade, the agent of Peshwa for the use of the clerk of Vaidyas, Naro Anant Gadre, to take the family of Hari Krishna Kane from Umarkhed to Poona. On this letter of permit there are his round seal and mortab.

No. 26　　श्री　　आषाढ शु. ७।१६६८
जून १४,१७४६

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री विसाजीपंत दादा स्वामीचे सेवेसी.

सेवक लंबोदर धुंडिराज सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता आषाढ सुध सप्तमी मुकाम पवनी स्वामींचे कृपेंकरून सुखरूप असो विशेष. इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री बावासाहेबाचे पत्रीं व तीर्थस्वरूपाचे पत्रीं लिहिले आहे, त्यावरून कळों येईल. श्रीमंत राजश्री अपाचें वर्तमान पूर्वी विस्कळित आले होतें. सांप्रत वर्तमान आलें आहे कीं, अपास तीन जखमा आहेत, रायाजी पांढरे व असाजी अटोळे व अबाजी सिंदे व हरजी सिंदे ऐसे सरदार देखील आहेत, आणखी कितेक लोक त्याजपाशीं जमा जाले आहेत, त्यासी मुस्तफाखानाच्या डेरियामधें आहेत, रोजिना शत रुपये खर्चास देत आहेत, म्हणून वर्तमान आलें आहे. त्याच्या शोधास माणसें बैरागी श्रीमंत राजश्री तुळजापंत दादा यांनीं पाठविले आहेत. ईश्वरीइछेकरून सत्य वर्तमान येईल तेव्हां लिहूं. कृपा लोभ असो दीजे. हे विनंती.

श्रीमंत राजश्री बाबूराव स्वामीचे सेवेसी सा. नमस्कार कृपा लोभ असो दीजे हे विनति.

(26) Lambodhar Dhundiraj writes to Vishwanathbhat from Pawani that Appaji Somavansi received 3 wounds and he was accompanied by Rayaji Pandhare, Yesaji Atole, Abaji Shinde and Harji Shinde and other Sardars. They are all

arrested and kept by Mustafakhan in his camp, who spends hundred Rs. or so for their daily expenses. In order to verify this news, Tuljopant sent some Bairagis i. e. mendicants. On their return the truth will be out.

छ. २ रजब
No. 27 श्री शंकर आ. शु. ३|१६६८
जुलै १०,१७४६

याद्री जमा सनगें सुा सबा आर्बैन मया आलफ छ २ रजब. आदाये सनगें

विश्वनाथभट
२ पहिलावाडा
१ तिवट कुसुंबी
१ सेला जाफरखानी
—
२
२ राजश्री येमाजीपंत
१ तिवट केशरी
१ सेला खसखसी
—
२
१ ताईकडील पागोटें ताराबाई
२ वाडा दुसरा
१ तिवट
१ सेला जाफरखानी
—
२
२ फत्तेसिंग बावा
१ तिवट
१ सेला जाफरखानी
—
२
२ बराणजी मोहिते
१ तिवट
१ सेला अष्टगोली पांढरा
—
२
४

४ पंतसचिव
२ तिवटें
२ सेला जाफरखानी
—
४
१ बापूभट वैद्य तिवट
३ राजश्री स्वामीकडील पोशाख
१ तिवट निंबोली
१ सेला जाफरखानी
१ छीट जोडी
—
३
१ शिलकपैकीं पागोटें
—
२६

तिवटें	खसखसी	अष्टगोली
१५	२	१

जाफरखानी	छीट जोडी
७	१

खर्च
१ बाळंभट
१ नागपूर येमाजी खंडोजी बळी
—
२

१ सिवाजी मोहिते पागोटें
१ सिदंभट ठकार पागोटें कलसपाक
२ देवराव वजीर
  १ तिवट
  १ सेला जाफरखानी
  —
  २
२ राणोजी भोसले
  १ तिवट उदी
  १ सेला खसखसी
  —
  २

२ राजगड
  १ निंबोळी
  १ कलसपाकी
—
४
१ विसाजी बाबाजी
१ कृष्णा चाकर
१ सदाशिव तांबट
—
७
८ बाकी

(27) This is an account of dresses received by Vishwanathbhat from various well-known persons.

No. 28 श्री+रामोजयति श्रावण शु. ४।१६६८
जुलै ११,१७४६

श्रीमंत राजश्री रघुजीबाबा भोसले गोसावी यांसी.

स्नो खंडोजी गोगवले हावालदार महालभांडारगृह, राम राम विनंती उपरी. बा यैवज सरकार दोन लक्षपैकीं देणें. रवानगी खर्च तुम्हांकडे. त्यास रुपये

रा. बालंभट वैद्य ५०००
रा. विश्वनाथभट वैद्य २०००
खरिदी पदक देणें तुम्हांस १५००
गुजारत विश्वनाथभट वैद्य
———
८५००

येकून साडे आठ हजार देऊन पावलियाचें कबज घेतलें पाहिजे. तेणें प्रों मजरा असे. छ ३ माहे रजब सुा सबा आर्बैन मया आलफ + हे विनंती.
बार (मोर्तब सुद).

+ पुढील अक्षर लेखकाचें.

(28) Khandoji Gogawale asks Raghuji Bhosle to pay to the persons mentioned, the money against their names, out of Rs. two lacs to be received from him.

No. 29 श्री भाद्रपद १६६८
आगष्ट १७४६

वेदशास्त्रसंपन्न राजश्री **विश्वनाथ भट मामा वैद्य** स्वामी गोसावी यासी.

पो **आनंदराऊ सखदेव सेनाकर्ते** सां नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणोन श्वकीये लेखन करित गेलें पाहिजे विशेष. आमचे मामा राजश्री **कृष्णाजी भास्कर** राजश्री **रघोजीबावा** यांजकडे चाकरीस होते, त्यास श्रावणमासीं देवआज्ञा जाली म्हणोन त्यांच्या जावयांनीं आम्हांस लिहिलें. त्यांजकडे सरकारचें कर्ज आहे तें आमचे गुजारतीचें आहे. मग आम्ही सौादिसपन्न **बाईसाहेब** यांस निवेदन केलें. त्यावरून त्यांणीं राजश्री **राघो अनंत** कारकून व हुजरे पाठविले आहेत, तरी तुम्ही आमचे आत आहा. जैसें कळेल तैसें राजश्री **राघोजी बावास** सांगोन आमचा गला मोकला होये तें केलें पाहिजे. आम्हांस जें संकट तेच तुम्हांस, हे गोष्ट पुर्ती ध्यानास आणून पारपत्य करून रुपया ज्या वाटेनें उगवे, तें केलें पाहिजे. त्यांच्या जावयास चार गोष्टी मामूल करून सांगणें. तुम्ही ही बिशातीचे खावंद होऊन त्यास दुसऱ्याच्या कर्जात घालावें यैसा स्वधर्म आहे यैसें नाहीं. याजप्रमाणें सांगोन यैवज पदरीं पड तें केलें पाहिजे. विस्तारें ल्याहावें यैसें नाहीं. आमचा मुसनफ व गेंद किरमेजी तुम्ही गेला तेव्हां तुम्हांस सांगितली होती, तर ते याजबरोबर पाठऊन देणें. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ निरंतर असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

(29) Anandrao Sakhadeo Senakarte writes to Vishwanath-bhat that Krishnaji Bhaskar, a servent of Raghuji Bhosle died in the month of last Shravan. He was his maternal uncle and borrowed some money from Senasaheb Bhosle, through the influence of his son-in-law. The queen is asking him to pay the money. Sakhadeo wants Vishwanthbhat to intervene and get the matter amicably settled. Sakhadeo addresses the addressee as Mama. It seems Vishwanathbhat's wife and Sakhadeo's wife were sisters. Vishwanathbhat's wife belonged to the Patwardhan family of Makhajan.

श्री+शंकर

No. 30

भाद्रपद १६६८
आगष्ट १७४६

राजश्री मोहनसिंग भोसले गोसावी यासी.

दा। अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रो। विसाजी रघुनाथ वकील आसिर्वाद विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करणें विशेष. तालुका छतीसगडचे यैवजी राजश्री रघोजीबावा भोसले यांणीं दरबार खर्चाची वरात रा। २००० दोन हजार रुपयेची वरात दिल्ही आहे. तो यैवज वसूल करावयासी रा पाठविले आहे व राजश्री सेनासाहेबसुभा यांचें पत्र आलाहिदा पाठविलें आहे. तरी सदरहू यैवज यांचे पदरीं घालणें. मार + रुपये १०० देणें. बहुत काये लिहिणें. हे आसिर्वाद.+

+ मधील मजकूर खाशाचे हातचा आहे.

(30) Vishwanathbhat Vaidya Vakil of Bhosla writes to Mohansing Bhosle, an illegimate son of Raghuji to pay Rs. 100 to the bearer of this letter.

No. 31

श्री

बुधवार
भाद्रपद शु. ८।१६६८
आगष्ट १३,१७४६

पुा राजश्री रघोजीबावा भोसले सेनासाहेबसुभा गोसावी यांसी.

छ. विनंति उपरी. सौाग्यवती राधाबाई यांस बरें वाटत नव्हतें. ती आजी प्रातःकाळीं भाद्रपद सुध अष्टमी बुधवारीं देवाज्ञा जाहली. राजश्री प्रतिनिधीपंत बहुत श्रमी जाहले. होणारास उपाय नाहीं. हे विनंति.

(31) S. Radhabai, Shriniwas alias Shripatrao Pratinidhi's wife, died on 13-8-1746.

२९

श्री   भाद्र. शु. १३।१६६८

No. 32   आगष्ट १७,१७४६ रविवार

श्री सकलतीर्थस्वरूप राजश्री **बाबा वडिलाचे सेवेसी.**

अपत्ये **रायाजी भोसले** कृतानेक चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत विनति येथील क्षेम भाद्रपद शुध त्रयोदसी रविवार मुकाम मौजे **भांब** वडिलाचे कृपेकरून सुखरूप असो विशेष. सांप्रत आपलें आसिर्वाद पत्र येऊन परामर्ष जाहला नाहीं. याकरितां चित सापेक्षित आहे तरी सर्वदा पत्रद्वारें परामर्श केला पाहिजे. यानंतर आम्ही या स्थलास आलियावर वडिलास पत्र पाठविलें होतें. तें पत्र प्रविष्ठ होऊन वडिली श्रावण शुध पंचमीस उत्तर देऊन जासुदास रवाना केलें. परंतु पर्जन्यामुळें जासूद मार्गींहून आम्हाजवळ पावते व्हावयास पंधरा दिवस लागले. वदी पंचमीस पत्रें पावलीं. सविस्तर वर्तमान कलों आलें. **बंगालियाचे** स्वारीचें वर्तमान लिहिलें तें कळलें. वडिली विदेशांत राहोन श्रम साहास करावयास अंतर केलें नाहीं हें संपूर्ण कलों आलें. आम्हास आपण लिहिलें कीं, रा **गोपाळराम** अथवा रा **राघोसुरो** यांसि पाठवावे. त्यास वडिलीं उत्तमच विचार लिहिला. त्यास **गोपाळराम** यांचे शरीरीं वेथा जाहलियामुळें ते **सातारा** राहिले. पुढें दसरा करून ते येणार. रा राघोसुरो समागमें आहेत. यांस पाठवावें ; परंतु पर्जन्यवृष्टी बहुत. नदीनाले मार्गी फार. तथापि आठ चार दिवस पर्जन्याची उघाडी नाहीं. याकरितां पाठवावयासी अनकूल पडलें नाहीं. आमचा हेत कीं, वडिलाचे भेटीस बहुत दिवस जाहालें आहेत, आणि विदेशी राहाणें जाहालें होतें, याकरितां आम्हीच वडिलांचे भेटीस यावे हाच विचार आल्या दिवसापासून आहे. परंतु पर्जन्याकरितां अंतराये जाहला आहे. पर्जन्य आठ दिवस उघडलियानें आम्ही व समस्त मंडली येऊन पोहचतों. भेटीनंतर साकल्य वर्तमान विदित करून पुढें जो विचार आम्हांस सांगतील त्याप्रमाणें विचार करूं. आमचा सर्व भार व हेत वडिलांचे वचनावर आहे. **साताराहून** या प्रांतें यावयाचें कारण हेंच आहे. वडिलांस कललें पाहिजे. प्रस्तुत आपलें सविस्तर वर्तमान लिहावयाची आज्ञा केली पाहिजे. विशेष लिहिणें तरी आपण वडिल आहेत + हे विनति.

\+ पुढील अक्षर लेखकाचें स्वदस्तुरचें आहे.

(32) Rayaji Bhosle writes from Bham to Raghuji expressing his desire to visit him at an early date. He congratulates him for his safe return from the grand expedition into Bengal and informs that he will see him after the rainy season and settle the further course.

No. 33 श्री १० साबान
भाद्र. शुध १३।१६६८
आगष्ट १७,१७४६

राजश्री विसाजी रघुनाथ वकील गोसावी यासी.

श्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत. सुा सबा आर्बैन मया व आलफ. राजेश्री विसाजी गोविंद कमाविसदार, दिमत चिरंजीव राजश्री साबाजी भोसले, मोकदम गांवगना प्रां देवगड यांसी, रदकर्जे वगैरे रुा ३७०० सततीसें देविले असेत. देणें जाणिजे. छ. १० माहे साबान बहुत काये लिहिणें. हे विनति. (मोर्तब सुद)

बार

(33) This letter is written by Raghuji Bhosle to Vishwanathbhat to Pay Ro. 3700 to Visaji Govind, the agent of Sabaji Bhosle.

No. 34 श्री १७ साबान
भाद्रपद वद्य ४।१६६८
आगष्ट २४,१७४६

रघोजीचा सिका व
मोर्तब यावर आहेत.

राजश्री महादाजी केशव सुभेदार प्रा चांदे गोसावी यांसी.

छ अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत सुा सबा आर्बैन मया व आलफ. संस्थान मजकूर पैकीं दरबार खर्च मा राजश्री विसाजी रघुनाथ वकील यास रुा २००० दोन हजार देविले असेत. तरी सदरहू दोन हजार रुपये मारनिलेकडे देणें. जाणिजे. छ १७ माहे साबान बहुत काये लिहिणें. (मोर्तब सुद.)

बार

(34) Raghuji Bhosle writes to Mahadaji Keshav Subhedar of Prant Chande that he should pay Rs. 2000/- as Darbar expenses to Vishwanathbhat Vaidya, the ambasadar.

No. 35 श्री+शंकर आश्विन वद्य ९ शनिवार १६६८
सपटंबर २७,१७४६

श्रियासह चिरंजीव राजश्री **विस्वनाथभट** यासी प्रति **बाळंभट वैद्य** कृतानेक आसिर्वाद. उपरी येथील क्षेम ता। अश्विन बहुळ नवमी मंदवार पावेतों समस्त सुखरूप असो. यानंतर तुम्हीं भाद्रपदी आमवाश्येचें पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला, व राजश्री **रघोजी भोसले** सेनासाहेबसुभा यांचेंही पत्र आलें, तें प्रविष्ट जाहालें. त्यास राजश्री **फतेसिंग भोसले** याकडील बोलीचालीचा निश्चय होता. पेसजी त्यांचा व यांचा निश्चय जाहाला आहे कीं, **चांदे** राजश्री **फतेसिंग भोसले** यांसी राहावयासी द्यावें. व **वराडचे** वाटनी-पैकीं पाच महाल त्यांनीं राजश्री **रघोजी बावास** द्यावे, बाकी वराडचे महाल त्याचे वाटणीचे राहिले, त्यांपैकीं निमे महाल राजश्री **रघोजीबावांस** व राजश्री **रायाजी भोसले** यासी द्यावे, बाकी महाल राहिले, त्यांची यांणीं कमाविस करावी. याप्रों बोलीचा सिधांत जाहाला आहे. तरी राजश्री **रघोजीबावांचे** विचारें याप्रों करार होईल. होईल तर करावा, आणि राजश्री **कोनेरपंत** व तुम्हीं यावें म्हणजे यांचा व त्यांचा योग बनेल. कळलें पाहजे व **राजश्री रघुनाथ भटजीस** पाठवणें म्हणोन लिहिलेत, त्यास विचारें बोध करितां, यावें हा करार केला आहे. राजश्री **स्वामीची** आज्ञा ही घेऊन दिली, त्यास राजश्री **बऱ्हा[न]जी मोहिते** भाऊबीज जाहाली म्हणजे त्रितियेस स्वार होतात, त्या समागमें **भटजी** व सौभाग्यवती **ठकाबाई** व **कृष्णाजीपंत** येसें निघोन येतात, तुम्हीं त्या **पंतासमागमें** याल, त्यास तेथील कामकाज उरकून गुंता वारून येणें. राजेश्री **बाबूजी नाईक** बारामतीस **आले**. पुढें काय मनसबा होईल तो मागाहून लिहोन पाठवितों. राजश्री **राणोजी भोसले** याकडील येकोणीस हजार रुपयाची हुंडी त्या केली, म्हणोन लिहिलेत. त्यास अद्याप कोणी आला नाहीं व हुंडीचें वर्तमानही कळत नाहीं. कळलें पाहिजे. राजश्री **प्रधानपंतही** दिपवाळी जाहालियावर जाणार. वरकड वर्तमान यथास्थित **असे**. याप्रांतें प्रजन्य नाहीं. त्यामुळें लोक बहुत श्रमी आहेत. कोकणांत आज महिना प्रजन्य नाहीं, भातें तमाम मेलीं. चवथाई पाचवा हिसा पीक होईल येसें वर्तमान आहे. कळलें पाहिजे. बहुत काये लिहिणें हे + आसिर्वाद.

+ पुढील मजकूर लेखकाचे हातचा आहे.

(35) This letter gives important details of the affairs of Shahu's court, the settlement of the disputes between Raghuji and Fatesing Bhosle. This dispute was going on ever since the capture of Trichanapaly in whieh Babuji Naik

also was involved. The movements of the Peshwa and other members are essential for clearing the matters of Shahu's declining days. Rayaji Bhosle's portion is also considered. At this time there was no sufficient rain in Konkan and this fact threatened famine in that part.

		रविवार
No. 36	श्रीशंकर	का. शु. ८।१६६८
		आक्टो. १२,४६

श्रियासह चिरंजीव राजश्री विश्वनाथ भट यासी.

प्रती बाळंभट वैद्य कृतानेक आसिर्वाद. उपरी येथील क्षेम ता। कार्तिक शुध ८ रविवार जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत जाणें. यानंतर आम्हांकडील वर्तमान तरी यथास्थित असे. तुम्ही आपणाकडील कुशलार्थ लेहून वरचेवर पाठवीत जाणें. विशेष. राजश्री बऱ्हाणजी मोहिते सौ ठकाबाईस घेऊन आले आहेत, व वो राजश्री रघुनाथभट पटवर्धन ही आले आहेत, व कृष्णाजी केशव ही आले आहेत. भेटीनंतर सविस्तर श्रुत करितील. त्यास पेसजी त्यांनीं लिहिलें होतें कीं, कर्जदारीयांचा व दरबारचा बंदोबस्त करून हातरोखे पाठवून देणें, म्हणजे राजश्री रघोजी बावास घेऊन येतों. त्यास दरबारचा बंदोबस्त आहे. तो तुम्ही जाणतच आहा. कोणाचा पायपोस कोणाचे पाई नाहीं, यैसा प्रसंग आहे. त्यास सविस्तर वृत कृष्णाजीपंत सांगतील तो अर्थ चितांत आणणें. राजश्री रघोजी भोसले यांसि हुजूर यावयाचा आग्रह तुम्ही न करणें. त्याचे विचारें यावयाचा मनसबा जाहला तरी सुखरूप येऊत, परंतु तुम्ही आग्रह करून न आणणें. राजश्री संताजी भोसले व रायाजी भोसले उभयतां येक होऊन पाचच्यार हजार फौज जमा करून वराड प्रांतें धामधूम करणार म्हणोन वर्तमान अैकिलें; परंतु तुम्हांकडील पत्र कांहीं न आलें, त्यास येथून हातरोखे त्रिवर्गासही पाठविले आहेत. तरी त्यास तुम्ही घेऊन येणें. वरकड सविस्तर कृष्णाजी केशव जबानी सांगतां कळों येईल. तुम्ही तेथील कर्जावामाचा गुंता उरकून घेणें. येथें यैवजाची निकड आहे. हुंडिया करून सत्वर पाठविणें, आणिखी लौकर येणें. पाच।सात वेळां राजश्री स्वामीही व सौवती बाईसाहेब यांणीं तुमचें स्मरण केलें होतें. तरी गुंतारुता उरकून सत्वर येणें. दिरंग न लावणें. बहुत काये लिहिणें. आपाजी सखदेव दि॥ माणकोजी कोकरे येथें आले. सदाशिव बल्लाळ जोग याकडे पाच हजार रु॥ हुंडी पाठविली ती पावली. पेसजी जासुदाबा॥ लिहिलें आहे त्याचा जाब सत्वर पाठवणें. हे अशिर्वाद.

(36) There was a severe dispute going on between Rayaji and Raghuji Bhosle, for the settlement of which the services of Vishwanathbhat were employed. The letter throws valuable light on Shahu's affairs, even in declining days (See letter No. 38 of S. P. D. Vol. 20.) As mentioned in letter of 27-9-46 Barhanji Mohite, S. Thakabai, Krishnaji Keshav, and Raghunathbhat Patwardhan arrived in Satara. Santaji & Rayaji Bhosle are jointly preparing, it is heard, to fight against Raghuji in Berar. Shahu & the queen were inquiring about Vishwanathbhat's doings often.

श्रीरा+मचंद्र

No. 37

छ. २० सवाल
का. व. ७।१६६८
आक्टो. २५।१७४६

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री **बाळाजी पंडित** स्वामी गोसावी यासि.

पोष्य **चिमणाजी नारायेण** कृतानेक नमस्कार. विनति. येथील कुशल जाणून स्वकुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. आपणाकडील सावोत्रियाचा मखतियाचा यैवज पेस्तर साल सन समान चे रुपये राजश्री **बाळंभट** व **विश्वनाथभट वैद्य** यांकडे देविले बीा। रुपये.

१००० अश्वीन शुध प्रतीपदा
१००० चैत्र अखेर
५०० जेष्ट अखेर
———
२५००

येकून अडीच हजार रुपये हप्फियाप्रमाणें वैद्य मशारनिलेकडे देविले पाहिजेत. छ. २० सवाल सुा सबा अर्बैन मया अलफ+बहुत काये लिहिणें कृपा आसो दीजे. हे विनति.

+ पुढील अक्षर सचिवाचें स्वदस्तुरचें आहे.

५

(37) Chimnaji Narayan Sachiv requests the Peshwa Nanasaheb to pay Rs. 2500/- to Vaidya Brothers, out of the instalment due from him on account of Savotra Amal.

No. 38 श्री मार्गशीर्ष शु. १।१६६८
नवंबर ३,१७४६

रा० अंताजी जाधव दिा सेनासाहेबसुभा यासी आज्ञा केली ऐसीजे. पा अडगांव सरकार नरनाळा प्रां वराड हा महाल राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांजकडे दरोबस्त इनाम आहे, तेथें तिळप्राये उपसर्ग न देणें, म्हणून पेशजी आज्ञापत्र सादर केलें असतां, पा मजकुरीं धामधूम करिता, मौजे सवदले व मौजे बातखेड व मौजे कारले व मौजे हिरवेखेड येथील माणसें जखमी केलीत व मौजे बोरवे बुा व खुर्द व चंदनपूर व मौजे झरी व शाहापूर व मौजे पिंपरखेड या सहा गांवचा मुकासबाब आपणाकडे आहे ऐसें म्हणून वसूल नेता. म्हणोन हुजूर विदीत जाहालें. ऐशास आज्ञापत्रें सादर असतां ऐशा बदराहा वर्तणुका करिता, यात तुम्ही आपलें बरें काये पाहिलें आहे ? हे गोष्टी कार्याची नाहीं. पा मजकुरी धामधूम करावयास तुम्हांस प्रयोजन काये ? ऐसी वर्तणूक कार्यास येणार नाहीं, ऐसें जाणून वर्तत जाणें. याउपरी बोभाट येऊं न देणें. याउपरी देखत आज्ञापत्र सदरहू गांवचा वसूल तटला असेल तो पंडित मारानिलेकडील कमाविसदार पा मजकुरी आहे, त्याजकडे मुकासबाब, बाबती, सरदेशमुखी देखील दरोबस्त वसूल देणें. या कामास सुलतानजी चव्हाण व मल्हारजी पवार हुजरे पा. यांसी मसाला रुा २०० दोनसे देणें. जाणिजे. छ. २९ सवाल सुा सबा आर्बैन मयाअलफ + बहुत काय लिहून +

+ मधील मजकूर खाशाचे हातचा आहे.

(38) Shahu issues a strict warning to the agent of Raghuji Bhosle, against recovering the revenue of Pratinidhi's six Inam Villages. The last autograph speaks Shahu's mind on the aggressive attitude of Raghuji.

---

७ जिल्काद
No. 39 श्रीशंकर मार्गशीर्ष शु. ९।१६६८
नोव्हें. १०,१७४६

रघूजीचा शिक्का व मोर्तब
अष्टकोनी दुरेघी
पत्रावर आहेत

राजश्री **विश्वनाथभट वैद्य** गोसावी यांसी.

छ अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री **रघोजी भोसले** सेनासाहेबसुभा दण्डवत. विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष. पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनाभिप्रायें सविस्तर अवगत जाहला. तीर्थस्वरूप राजश्री **राणोजी बावा भोसले** यांकडील माहालाच्या इजारी याचे विशई लिहिलें, येसी यासी त्याचे तक्षमेचे माहाल जे आहेती ते तुम्हांस अवगतच आहेती. ते मनास आणून तद्नुरूप सिद्धांत करून त्याकडील सनदा पाठऊन देणें; तुम्ही बोलीचाली कराल त्याप्रमाणें रुपयाचा निर्गम करून देऊन. तुम्ही जें कराल तें आमचे हितावह कराल. हे आमची निशा असे. राजश्री **रायाजी भोसले** याकडील लोक मन मानेसे रोखेपत्र करून मुलकांत धामधूम करितातो. बजिनस रोखे हुजूर पाठविले आहेती. ते मनास आणून मागती पाठवून देणें, आणि येविशई राजश्री **स्वामीचे** सेवेसी विनंती करून त्यासी ताकीद करवणें जे, आपले माहालांत अमल करोत, याउपरी मुलकांमध्यें त्याजकडील जे धामधूम करितील त्यांचें पारपत्यें करणें जरूर जाहलें. तुमच्या पत्राचें प्रत्योत्तर आलियासारिखें जें कर्तव्य तें करून तेथील प्रसंगांविशई सर्व भरोसा तुमचा असे. तुम्हीही लौकर येणें. येथें आलियानंतर सकल प्रसंग विचार तुमच्या चितानरूप होऊन येईल, येविशई आपलें समाधान असो देणें. जाणिजे रा छ ७ माहे जिल्काद + बहुत काये लिहिणें. लोभ असूं देणें हे विनंती. + (मोर्तब सुद)

(मुद्रा: श्री० श्रीशाहुराज पदाम्भोज भ्रमरायित चेतसा बिंबात्मजस्य मुद्रेषा राघवस्य विराजते)

+ मधील अक्षर लेखकाचें

३६

श्रीशंकर

पुरवणी राजश्री विश्वनाथभट वैद्य गोसावी यासी.

विनंति उपरी राजश्री राणोजी बावाकडील महालांचा गुंतका राजश्री स्वामीचे विद्येमानें सिधांत करून बोलीचाली निश्चयेरूप करून त्यांची निशापत्र करणें, तें करून त्याकडील सनदा घेऊन तुम्ही सत्वर येणें. तुम्हीं आपला खासगत मजकूर लिहिला होता, त्याची ताकीद पत्रें देविलीं असेतीं. राजश्री रायाजी भोसले याजकडील लोकांनीं मुलकांमध्यें उपद्राप आरंभिला आहे तरी त्यांचें पारपत्यें करणें, याउपरी जरूर जाहलें. तरी हेही गोष्टीचा बंदोबस्त करणें, तो करून तुम्ही सत्वर येणें. जाणिजे रा। छ ७ माहे जिलकाद + बहुत काये लिहिणें. हे विनति. + (मोर्तब सुद)

+ मधील अक्षर रघूजीचें आहे.

(39) Further light is afforded on the disputes between Raghuji, Rayaji and Ranoji Bhosle by these two letters from Raghuji. At this time Vishwanathbhat had come to Satara. These letters give exact date to elucidate the account given in P. D. Vol. No. 20, in this connection. Rayaji's disturbance is also referred in this lerter. Raghuji expresses perfect confidence in Vishwanathbhat and requests him to come in Berar soon.

No. 40 श्री मार्गशीर्ष वद्य २।१६६८
नोवेंबर १९,१७४६

मोर्तब व शिक्का
अष्टकोनी दुरेघी
यावर आहेत

दस्तक सरकार सेनाधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा ता। ठाणेदार व कमाविसदार व स्वारसिलेदार व पागा व बाजे लोक चौकीदार रहदारी अहद लस्कर तहद सातारा सु॥ सबा आर्बैन मया व अलफ

राजश्री विसाजी रघुनाथ वकील यांचें कापड, बैल ५० पन्नास वगैरे जिनस घेऊन जात असेत, यांसी मार्गी हसिलाचा तगादा न करणें. जाणिजे. छ १९ माहे जिलकाद. (मोर्तब सुद)

(40) This is a permit issued by Raghuji Bhosle to Vishwanathbhat Vaidya, ordering the officers, not to levy any money and obstruct the taking of oxen with cloth from Laskar to Satara.

No. 41 श्री मार्गशीर्ष वद्य ३।१६६८
नवंबर २०,१७४६

श्रीमंत राजश्री बाळंभट व ता राजश्री विश्वनाथभट वैद्य स्वामीचे सेवेसी.

स्नो॰ नारो अनंत गद्रे कृतानेक सां नमस्कार. विनंती. येथील क्षेम ता मार्गसीर वद्य तृतिया मुा नागपूर जाणून स्वकीये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विषेश स्वामीकडून बहुत दिवस कागद येऊन परामृष होत नाहीं, याकरितां चित्त सापेक्षीत आहे, तर ऐसें नसावें. हरघडी आलिया माणसाबा पत्रीं कुषलार्थ लिहोन संतोषवीत असिलें पाहिजे. विषेश.श्रीमंत राजश्री रघोजीबावा चांदेयांसी जुजत आहेत, मोर्चेबंदी केली आहे; परंतु प्रस्तुत चांदेकरांनींही जोर फार धरिला आहे. से-दोनसे माणूस चांदेकराचे किलेयाबाहेर येऊन श्रीमंतांचे मोरच्यावरी घालतात. चांदे महिना दोन महिने येत नाहीं. हलीं रा शामजी रायाजी यांस नागपूरचा सुभा रा. नरहरपंताकडे होता तो दूर करून शामजीपंताकडे सांगितला आहे. त्यास देवगड प्रांतें मुलकांत स्वारीपटी दरसदे रुा, ३६ प्रों ऐवज नेमून दिल्हा आहे, त्याची कर्यात भूगावावरी पटी रुा आठसे आठावन घातली आहे. कर्यात मजकुरास दोन स्वार दररोज दोन रुा, शिवाय खुराक, करून पाठविले होत. त्यांजवरी आम्ही सुभेदाराचे भेटीस आलों, त्यांनीं रुपयांकरितां फारसा तगादा केला आहे. त्यास आम्हीं त्यासी करार केला आहे जे, श्रीमंताकडे चांदेयास जाऊं, तेथें जे आज्ञा होईल त्याप्रों. वर्तणूक करून. त्यास सुभेदारांनीं आठा रोजाचा करार करून वरातदार उठविले आहेत. आम्ही वद्य पंचमीस स्वार होऊन चांदे यास जाऊं. सेवेसी कळावें म्हणून लिहीलें आहे. कर्यात मजकूरचा गुदस्ता प्रों निमे तीन हजार रुा पाटिलाचें रोखेपत्र करून उगवून घेतले आहेत. टेकाडीचें वर्तमान पेसजी सेवेसी लिहीलें होतें. त्यावरून विदीत जाहालेंच असेल.

गोपाळाचा हुंड्या साडे एकविसशाच्या पेसजी पाठविल्या. त्या पावल्याच असतील. वरकड वर्तमान येथास्थित असे. रा केसोपंत व संकराजीपंत यांस बरें वाटत नाहीं. ज्वर येत आहे. चांदेयास रा कासीराव भास्कर आहेत, परंतु निर्माल्य आहेत, त्याजवरी इतराजीच आहे. ऊर्जिताचा प्रसंग दिसत नाहीं. श्रीमंताजवळ कारभारीही कोणी नाहीं. जो कारभार पूर्ववत् आहे त्याचप्रों आतांही आहे. कळलें पाहिजे. बहुत काय लिहीणें. लोभ असो दीजे. हे विनंति.

राजश्री रामचंद्रपंत स्वामीस साष्टांग नमस्कार. विनंति उपरी. येथील कुषल जाणून स्वकीये लेखन करणें. या प्रांतीचें वर्तमान श्रीमंतास लिा आहे. त्यावरून कळों येईल. या पत्राचें उत्तर रा रघुनाथभट पटवर्धन यांचे तरफेन येथून रामजीपंत गेले आहेत, याजबा पाठविले पाहिजे. उत्तर लिहोन त्यांचे घरीं आपले माणसाबा पाठविलें पाहिजे. आमचे घरचें वर्तमान सविस्तर लिहोन पाठविणें, बहुत काये लिहीणें लोभ असो दीजे. हे विनंति.

चिरंजीव राजश्री लक्ष्मणपंतास आसिर्वाद. उपरी आपणाकडील व कोंकणचें वर्तमान सविस्तर लिहोन पाठविणें. बहुत काये लिहीणें हे आसिरवाद.

(41) The disorganised affairs of Raghuji are here well evidenced. The details and dates are important.

No. 42 श्री

सबा आर्बैन १९ जिल्काद
मार्गशीर्ष वद्य ५।१६६८
नवंबर २२,१७४६

वैद्यांचा शिक्का व
मोर्तब लंबगोल
तिरेघी

अज स्वारी विसाजी रघुनाथ वकील ता मोकदमांनी मौजे राहाटगाव पा नांदगांवपेठ प्रां वराड सुा सबा आर्बैन मया अलफ. मौजे मजकूरची कमावीस साल मजकुरी राजश्री गोपाळ अनंत यासी सांगोन पाठविले आहेत, तरी तुम्ही रुजू होऊन मौजे मजकूरचा कारभार यांचे मारफतीनें करीत जाणें, आणि मारनिलेचे पोटाचा खर्च, गांवखर्चपैकीं देणें आणि किरकोळ बाबतीचा अमल मारनिलेकडे देणें. जाणिजे. छ. १९ माहे जिल्काद (मोर्तब सुद.)

(शिक्का:) ० ◡
श्री राजा शाहु च
रणी तत्पर रघुनाथ सुत
वीस्वनाथ नीरं
तर.

(42) This is an order by Vishwanathbhat to the Mokadam of Rahatgaon that the revenue collection of the village of this year will be done by Gopal Anant, with whom he should co-operate and get all the work done. He is to be paid for his own expenses from the village money (गांवखर्च).

No. 43 श्री मार्ग. व. ७।१६६८
नवंबर २४,१७४६

तीर्थरूप सौभाग्यादिसंपन मातुश्री **बायासाहेब** साहेबांचे सेवेसी.

आपत्येसमान **उदतसिंग सिरके** चेरणावर मस्तक ठेऊन सां दंडवत विनंती. विज्ञापना येथील कुशल जाणून स्वकीये लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. आम्हांकडील वर्तमान मार्गेश्वरे वद्य सप्तमी परयेंत साहेबाचे आसीरवाद करून समस्त सुखरूप असो. राजेश्री **रघोजीबाबा** व रा **रायाजी भोसले** यांच्या भेटी जालिया, त्यांस चिरंजीव **रतनसिंग सिर्के** यास रा **रायाजी बावांनीं** पनास स्वार बोली करून समागम घेऊन गेल व आम्हांस राजेश्री **रघोजीबावा** यांनीं आपणापासीं ठेऊन घेतलें आहे. साहेबांस कळावें म्हणून लिहिलें असे. प्रा **पातूर सेखबाहाडींचे** येथील नजर घासदाणा व मोकासा देखील सनदा आम्हांस दिल्हे. देऊन आपणापासीं ठेऊन घेतले असे. वरकड वर्तमान सविस्तर अर्थ रा **विस्वनाथ भट वैद्ये** सेवेसी निवेदन करतील. व राजश्री **रघोजीबावा** यांनींही आपलें वर्तमान सेवेसी लिहिलें आहे. हे आपल्या पायाखेरीज यांस दुसरा आसरा नांहीं. याचा सर्व अभिमान साहेबी धरिला पाहिजे. रा **विस्वनाथभटही** यांचे वर्तमान सविस्तर सेवेसी श्रुत करितील. राजश्री **बऱ्हानजीबावा मोहिते** व राजश्री **विस्वनाथभट वैद्य** यांनीं आम्हांविसीं बहुतसी खटपट करून त्यांस सांगोन आम्हांस ठेविले असे. साहेबांस कळावें म्हणून सेवेसी लिहिलें असे. बहुत काये लिहिणें कृपा लोभ करीत गेले पाहिजे + हे विज्ञापना. +

\+ मधील लेखकाचें स्वदस्तुरचें अक्षर आहे.

(43) This letter requires more consideration. It is written by Udatsing Shirke to his mother or queen Sakawarbai informing that after the meeting of Raghuji & Rayaji, Ratansing Shirke joined Rayaji with 50 soldiers and went

with him and the writer was kept by Raghuji for himself. At this time Vishwanathbhat and Barhanji Mohite were at Satara to tell all the details. Both tried best to keep the writer with Raghujibawa who was pleased to give him the sanads of, Sekh-Bahadiche for Najarana, Ghasdana and Mokasa. The writer expresses perfect confidence of Raghuji in the King and the Queen.

No. 44 श्री मार्ग. व. ७।१६६८
नवंबर २४,१७४६

तीर्थरूप राजश्री **बावासाहेब** व राजश्री **बापू** वडिलांचे सेवेसी.

अपत्येसमान **उदतसिंग सिर्के** चरनावरी मस्तक ठेऊन सां दंडवत. विनंती विज्ञापना येथिलें क्षेम ता। मार्गेश्वरे वद्य सप्तमी परयेत वडिलांचे कृपाद्रिष्टी करून समस्त सुखरूप आसो विशष. राजश्री **रघोजी बावा** व राजश्री **रायाजी-बावा** यांच्या भेटी जालिया, चिरंजीव **रतनसिंग सिर्के** यांस रा। **रायाजी-बावांनीं** पनास स्वार बोली करून घेऊन गेले. आम्हांस रा। **रघोजीबावा** यांनीं आपल्यापासीं ठेविले. पा। **पातूर** येथील नजर घासदाणा, मोकासा, यांच्या सनदा दिल्हे. वडिलांस कळावें म्हणून सेवेसी लिहिलें आसे. आम्हांसाठीं रा। **विश्वनाथ-भट वैद्य** यांनीं व राजेश्री **बऱ्हानजीबावा मोहिते** यांनीं फरसी खटपट करून साहित्ये करून यांजपासीं टेविलें. यांनीं बहुत कृपा करून ठेऊन घेतले आसे. वरकड वर्तमानही आम्हांकडील राजश्री **विश्वनाथबावा** मुखी निवेदन करतील, त्या वरून विदित होईल. बहुत काय लिहिणें कृपा करीत गेले पाहिजे. हे विज्ञापना + हे विज्ञापना. +

+ मधील अक्षर लेखकाचें आहे.

(44) This letter is written by Udatsing Shirke probably to Shahu and his father with the same contents as given in the previous letter.

---

२२ जिलकाद
No. 45 श्री मार्ग. व० ८।१६६८
नोव्हेंबर २५,४६

शिक्का वाटोळा
तिरेची

श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी.

विनंति सेवक आपाजी सोमवंशी सरलस्कर कृतानेक विज्ञापना. येथील वर्तमान ता. छ २२ जिलकाद स्वामीचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे. विज्ञापना महाराजांचें आज्ञापत्र सादर जालें, तेथें आज्ञा कीं, पा। सुपे येथें खेडीं राजश्री बाळंभट व। विस्वनाथ भट यांजकडे आहेत, त्यांस तुम्हीं उपसर्ग न देणें म्हणून आज्ञा. ऐसी यास मारनिलेनें स्वामी जवळ कर्जात खेडीं दिल्हीं आहेत, म्हणून विदित करून हें. आज्ञापत्र घेतलें आहे. तरी त्यांजकडे आम्हीं कर्जाचे पाच सातसे रुपये होते, त्यांपैकीं च्यारसे रोख दिल्हे, बाकी राहिले तेही पावते होतील. खेडियांची बोली किमपि नाहीं. ऐसें असोन सेवेसी निवेदन करितात, थोर आहेत. सरंजामाचा अर्थ आहे तो विदितच आहे, त्याहीमध्यें चहूंकडे चार खेडीं गेलिया मामलियाचा अर्थ राहात नाहीं. सेवकाचा अभिमान सर्व प्रकारें स्वामीस आहे. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना. (मोर्तुब सुद)

(45) On receipt of Shahu's order, Appaji Somavansi, Santaji's son, informs him of the incorrect complaint of Vaidya Brothers against his obstruction to them to enjoy the villages given to them in payment of money borrowed from them. Rs. 400 were paid and the balance would be returned soon.

No. 46 श्री + शंकर मार्ग. वद्य ८।१६६८
नवंबर २५,४६

तीर्थस्वरूप राजश्री बाळंभट बावा वैद्य वडिलांचे सेवेसी.

अपत्येसमान विश्वनाथभट वैद्य कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता मार्गशीर्ष वद्य अष्टमीपर्यंत मुा वैरागड नजिक उंदेरी येथें जाणोन तुम्ही आपला स्वकुशलार्थ लिहित असिले पाहिजे. विशेष मार्गसीर सुध (स)प्तमीचें पत्र पाठविलें तें पावोन साकल्यवृत अवगत जाहालें. येसेंच साकल्य वर्तमान दरबारचें वगैरे वरचेवर लिहित असिलें पाहिजे. यानंतर या प्रांताचें वर्तमान तर राजश्री रघोजीबावांनीं गांवच्या ताकिदी दिल्या आहेत, भुगांवाहून घोडीं लष्करांत आम्हांजवळ येऊन पोंहचलीं. रा नारोपंत आठापंधरा दिवसीं येतील. आम्ही सत्वरच येणार होतों, परंतु पंधरा दिवस राहाऊन घेतलें आहे, कामकाज तो आद्याप कांहीं जाहालें नाहीं, तुम्हांस कळावें. वरकड मौजे काराटीकर माहार येथें आले होते, त्यास कर्ज रुा १०० सेंमर दिले आहेत. त्याचा रोखा खंडोजी जासूद दिमा राजश्री (स)चिव याजबराबर पाठविला आहे. व्याजसुद्धां रुपये घेणें व जासूद मजकुराबरोबर म्हसी दुभत्या ५ पांच व गाई येक पाठविली आहे. काराटीकर माहार व जासूद व भिव्या पोरगा म्हसीबराबर पाठविले आहेत. म्हसी मार्गेत सोनगांवास ठेवून भिव्या पोरासह दोघी कुणबिणी कासीनवसीस ठेवणें. तेथें म्हसींची निगादास्त करतील. दुभतें आणून पोंहचावितील. वैरणकाडींची बेगमी तेथेंच करवणें. भिव्या पोराची पोटापाण्याची बेगमी करणें. गाई कराटीकर माहारा(बरा)बर पाठविली आहे. याजपासून घेणें. आम्ही सत्वरच येऊन सविस्तर वर्तमान वरचेवर लिहून पा. तुमचे शरीरीं आरोग्य नाहीं तर औषधी वगैरे उपाय करून आरोग्य होये तें केलें पाहिजे. राजश्री रायाजी भोसले व राजश्री रघूजी भोसले यांची समजाविसी जाहाली आहे. कळलें पाहिजे. दरबारीं बहुत सावधपणें राहाणें + सविस्तर वर्तमान लिहिणें. लोभ असो दीजे. हे विनंती.+

+ मधील मजकूर लेखकाच्या हातचा.

(46) The reconciliation of Raghuji and Rayaji Bhosle is reported in this letter. It was creditable to Vishwanath Bhat, who was employed by Shahu for that purpose.

No. 47 श्री शक १६६८
सन १७४६

श्रीमंत राजश्री **विश्वनाथभट वैद्य** स्वामींचे सेवेसी.

सेवक **महादाजी कृष्ण** सां नमस्कार विनंती उपर. तुमचा निरोप घेऊन स्वार जाइलों तो **पवर्नास** पावलों. येथील कुली मजकूर मनास आणून टेविला आहे. परंतु त्यांनीं मुहूर्त पाहिला त्याजला फार दिवस लागले आहेत. हलीं राजश्री **बयाजीपंत सुरंजीस बावांनीं** चाकर कोणी ठेविले होते. ते **बंगालियांत** श्रीमंत **जानोजीबावा**बराबर आहेत. चाकरीहि बहुत प्रकारें करितां आहेत. **सुरंजी** परगणियाच्या सनदा **सिरके** यांजकडे दिल्हा आहेत, या प्रहस्ताकडे **गोसावी** यांचें कर्ज हवाले देऊन **बंगालियांत** गेले आहेत. याची कांहीं स्थित **गोसावी** राहूं देत नाहीं. याजला **गोसावी** घेऊन जात होते, तेव्हां आम्ही **सुरंजीस** आलों. तेव्हां आम्ही पाहिलें, ब्राह्मण गाय विकत आहे, यास्तव त्याचें समाधान करून श्रीमंताकडे आले आहेत. आपण याचा अभिमान धरून कार्या करून घ्यावें. याची बोलीचाली येथें करून घेतली आहे. आम्ही आलियावरी निर्गम होईल. यासी अंतर कराल तर आमची आण आसे, आणि बंगालियांत चाकर असोन यावर परगणियासी घालमेली जाहाली. हे तो अैकोन उटोन येणार. तेव्हां उत्तम नव्हे. यास्तव श्रीमंता विचार करून सांगोन आणिखी कोठें जागा लावून देणें. अथवा **सुरंजीची** सनद करून देवणें, अनमान कराल तर तुम्हांस **भास्करबावाची** आण असे. हे विनंती.

(47) Mahadaji Krishna Kane requests Vishwanathbhat that Bayajipant of Suranji is in need of his help. He has gone with Janojibawa in Bengal after arranging to pay the debt through Gosavi and Shirke by mortgaging the Suranji Paragana. He is required to sell the cow. Vishwanathbhat is, therefore requested, to help Bayajipant.

१७४७

No. 1 श्री शके १६६८ सन १७४७.

राजश्री कोनेरपंतबाबा गोसावी यांसी,

द्दा अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्ये स्नों पदमोजी जाचक

ानेक दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणौन स्वकीयें कुशल

न केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें बहुत समाधान

ालें. तेथें लिहिलें कीं, तुम्हाकडील अर्थ राजश्री विस्वनाथभट वैद्य

राजश्री सिवरामपंत यांणीं सांगितला, तो सविस्तारें कळो आला.

ंत राजश्री बाबासाहेबांस विदित करून त्यांचें व या उभयतांचे

क्ष बोलणें करून तुम्हांस पत्र लिहिलें आहे, त्याप्रमाणें मनास आणून

ार करणें हा जागा पुरातनपासून तुमचा आहे, पुन्हा जो जागा

तो जागा जोडावा, यांत उचित आहे, आम्हां पासून तुमच्या

यांस अंतर होणार नाहीं, ऐसें लिहिलें. त्यावरून लिहिला अर्थ

ो आला. यैसी यासी आम्ही औंधे जाचक *नवाजी, सर्व वाढविले व

दर सन्मान व आम्हा लोकांच्या अडी तुम्हीच चालविल्या आणि

म्ही वडिलावडिली भोसले यांची शेवा निष्ठेनें केली. आतां त्याप्रमाणेंच

म्हांस पदरीं घेऊन आमचा सरंजाम चांगला नेमून देऊन व नालबंदीची

मी व पुणियांतील कर्ज देणें आहे त्यांचा निर्गम करावा. आम्हांवर

दर बहुमान करावा. पुर्वील किंत मनांत खावंदानें व आम्ही न

ाणावा. शफ्रुतपूर्वक चालावें. ऐसें जालिया आपण तुम्हांजवळ येतों,

माणें आपण करून द्यावें. अतःपर जें करणें तें तुमच्या भरवसियावरी

ुमच्या वचनावरी नजर देऊन करितों. तुम्ही भले आहा. यशश्वी आहा.

टे आम्हीच येऊन. चिरंजीव राजश्री. मानापाचे पुत्र आहेत त्यांस

कितां येत नाहीं. यास्तव त्यासही पदरीं घ्यावें. त्यास सरंजाम द्यावा

दर सन्मान करावा. आतां परगणे आहेत ते झाडींतील आहेत. तेथें

च्यार टके वसूल होत, ऐसें नाहींत. यास्तव अलीकडे देशच्या

ांत चांगले खुलासा वसुली द्यावे. येविसीचा सविस्तर अर्थ राजश्री

नाथभट वैद्य व राजश्री सिवरामपंत यांसी लिहिला आहे, तो

मनास आणावा आणि तुमचीं पत्रें व या उभयतांचीं पत्रें आलीं म्हणजे दर्शनास येतों. आपले ऊर्जित करावें. कुटुंबादाखल तुम्ही चालवावें. ह्या गोष्टी मन:पूर्वक तुमच्या व खावंदाच्या मनांत आलिया तरी आपण येतों. संशय नाहीं. तुमच्या भरवसियावरी येतों. आमचे सर्व प्रकारें चालवावयासी धणी तुम्ही आहात. बहुत काय लिहिणें स्नेह असो दीजे + हे विनंती.

* नामांकित, प्रख्यात + पुढील अक्षर लेखकाचें स्वतःचें.

(1) Padmoji Jachak writes to Konnerpant Kolatkar, who knew from Vishwanathbhat and Shivram Tukadao Karmarkar what he intends, that if Raghujibawa is ready to give his family the former, old position under him, by giving the Saranjam, nalbundi allowance, and paying off debt of Poona Sawakars, he is surely ready to go to him. He is expecting Konnerpant's Vishwanath-bhatt's and Shiwarampanth's letters after this settlement with Raghuji.

No. 2 श्री. शके १६६८
सन १७४६

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री विश्वनाथभट वैद्य स्वामी गो.

सेवक रामचंद्र कोनेर कृतानेक नमस्कार, विनाति उपरी तुम्ही गेलियांपासून तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर हरघडी पत्र पाठवून संतोषवीत जाणें. इकडील जें वर्तमान होतें तें वारंवार तीर्थरूपास लिहितों आणि तुम्हीही श्रीमंता जवळ बोलिलेस जें, एका दो दिवसीं राजश्री पंतास घेऊन येतों. त्यास येथील गोष्टी येथेंच विसरला. तेथें गेलियावर इकडील तुम्हांस स्मरण होत नाहीं. ऐसें दिसोन आलें. या उपर तुम्ही तीर्थरूपाबरोबर सत्वर येणें. यावयासी विलंब न लावणें. राजश्री पद्मोजी जाचकाचा कागद आला आहे तो बजिनस तीर्थरूपांकडे पाठविला आहे व तुमचा कागद तुम्हांकडे पाठविला आहे, त्याजवरून सविस्तर वृत्त कळेल.* बहुत काय लिहिणें हे विनंती.

(2) Ramchandra alias Baburao Konher Kolatkar writes to Vishwanathbhat that Padmoji Jachak's two letters—

one addressed to dear father and the other to you—are sent herewith. He also shows the necessity of both coming to Satara soon.

---

* पुढील लेखकांचें स्वतःचें हस्ताक्षर.

No. 3 श्री. शके १६६८
सन १७४७

राजश्री विश्वनाथभट वैद्य गोसावी यासी

दा. अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नों

पद्‌मोजी जाचक दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीयें लेखन केलें पाहिजे. विशेष तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. तेथें लिहिलें कीं, पूर्वील किंत टाकून एकनिष्ठेनें वर्तणूक केलिया तुमचे चालवावयासि राजश्री रघोजीबाबा व राजश्री कोनेरपंत अंतर करणार नाहींत, ऐसें कितेक सविस्तारें पत्रीं लिहिलें. येविसीं राजश्री बाजी विठल यांसि जबानी सांगणें तें सांगितलें आहे व राजश्री रघोजी-बाबा व राजश्री कोनेरपंत या उभयातांचीं पत्रें पाठविलीं आहेत, तीं मनास आणणें व राजश्री सिवरामपंत यांणींही तुम्हांस लिहिलें आहे त्यावरून कळेल, तरी ये गोष्टीचा सिधांत लेहून पाठवणें, म्हणोन लिहिलें. यैसीयासी आपले वडिलावडील यांणीं भोसल्यांची सेवा निष्ठेनें केली. आम्ही औवे जाचक नवाजीस भोसले यांचे. ऐसें असतां लक्षुमणजी खंडागाळा याणें खावंदास कितेक वदगोईच्या गोष्टी समजाऊन आम्हांत व खावंदांत विरुध पाडिलें. आम्ही गेलियावरी मागें धणियावरी निमित्य घालून आपला भाऊ चिरंजीव राजश्री मानाजी जाचक यासि मारिलें. त्या उपरी आपण कांहीं दिवस त्या प्रांतेंच होतों, आलीकडे आजि पाचसा वर्षे राजश्री पंतप्रधान या समागमें आहों. तेही आपले बरेच रीतीनें चाल-विताती. परंतु आपण पुरातन चाकर भोसले यांचे, ते त्यांचे त्याजपासीं राहून निष्ठेनें शेवा करून आपले सरंजाम करार करून घ्यावें, आणि आपलें ऊर्जित-खावंदापासून करून घ्यावें, हा मनोदय आपला आहे. दुसरा अर्थ आपणांस किमपिही नाहीं. या करितां आम्ही आपणाकडील निश्चय

जो आहे तो तुम्हांस लिहिला आहे. या प्रमाणेच त्यांच्या मनांत असि
तरी बरंच जालें. यास्तव तुम्ही राजश्री रघोजीबाबा व राजश्री कोने
पंत यांसि पुसोन निश्चयरूप आम्हांस पदरीं घेऊन सरंजाम नेमून देऊ
आदर सन्मान करून आपलें ऊर्जित निःकपटपणें करितील, तरी शो
मनास आणणें आणि निश्चयाचें पत्र त्या उभयतांचें व तुम्ही आपलें
येसीं पत्रें राजश्री सिवरामपंत याजकडे देणें. ते तीं पत्रें व आपलें पत्र
आम्हांकडे पाठवितील. दर्शनास दिनशुध लिहितील, त्या प्रमाणें आपण
येऊन. दुसरें पुर्वणीचें पत्र आहे व यादी आहेत, त्या प्रमाणें कार्य
करून पाठवणें. बहुत काय लिहिणें स्नेह असो दीजे हे विनंती.

श्री

पुरवणी राजश्री विश्वनाथभट वैद्य गोसावी यासि.

विनंति, उपरी पहिले पत्रीं सविस्तर अर्थ लिहिला आहे तो
अक्षरशाहा ध्यानांत आणून उतर पाठवणें, बोलिस तफावत नसावी.
ज्या प्रमाणें करार करावा त्या प्रमाणें खावंदानें चालवावें व आम्हीही
करारा प्रमाणें चालोन निष्टेनें शेवा करून. आपला दुसरा विचार नाहीं.
चिरंजीव राजश्री मानाजी जाचक याचे पुत्र शेवेसी उमेदवार आहेत,
त्यास टाकून आम्हीच आलियानें आम्हांस उचित नाहीं. या करितां
पुरातन मानापाचा सरंजाम आहे तो त्यांच्या पुत्रास करार करून द्यावा,
सरंजामाची यादी व बहुमानाची व भेटीचा सिधांत व हालीं नालबंदी
व पुणाचें कर्ज वारावें, यांचा करारनामा तहबंद सिंकियानसी पाठवणें.
ते आलियावरी आपण भेटीस येतों. वरकड कितेक मजकूर राजश्री
सिवरामपंत यांचे पत्रीं लिहिला आहे व राजश्री बाजीपंत यांस मुख-
वचनें सांगितलें आहे, त्यावरून कळेल.+ बहुत काय लिहिणें स्नेह असो
दीजे हे विनंती.

+ पुढील मजकूर पद्मोजीच्या हातचा.

(3) These letters are written to Vishwanathbhat by Padmoji Jachak. asking him to do his best to get back their old family saranjams &c in the name of Manaji's son from Raghuji Bhosle, whose ears were poisioned by Laxmanji Khandagale against his family resulting in

Manaji's death. He assured that he will leave the services of the Peshwas and join Bhosle's services on receipt of his letter with Raghuji's consent to fulfil the conditions proposed.

No. 4 श्री शके १६६८
सन १७४७

राजश्री विश्वनाथबावा गोसावी यांसी

दा. अखंडितलक्षुमी आलंकृत राजमान्ये. स्नेहांकित मानाजी जाचक दंडवत. विनंति उपरी, येथील कुशळ जानऊन स्वकीयें लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष. तुम्हांकडून रा रामाजीपंत आलेत त्यांहीं कितीक वर्तमान सांगितलें, त्याजवरून तीर्थरूप रा पदमोजीबावा यांचें बहूत समाधान करून ठेविलें आहे. यैसीयास श्रीमंताचें येन येथ अद्याप होत नाहीं, तेथील काये वर्तमान आहे तें कळत नाहीं. यैसीयास रा पंत मजकूर तुम्हांकडे पाठविले आहेत तरी अती सत्वर श्रीमंतास घेऊन आलें पाहिजे, वरकड वर्तमान रा रामाजीपंत जबानी सांगतां कळूं येईल. बहुत काये लिहिनें. हे विनति.

---

(4) Manaji Jachak requests Vishwanathbhat to come with Raghuji as early as possible. Unless they come, Padmoji, his father, will not find satisfaction, notwithstanding his attempts to do so, from the account given by Ramajipant.

No 5 श्री शके १६६८
सन १७४७

राजश्रियाविराजित, राजमान्य राजश्री बाळंभट व विश्वनाथभट वैद्य स्वामीचे सेवेसी.

पो गोविंद सामराज व रामचंद्र सामराज कृतानेक सां नमस्कार विनति, उपरी स्वामींचे आम्हांस पंढुरच्या रसदेबा यैवज देणें होतें, त्यांपैकीं कर्ज वजा करून कुमाजी लेकवळा व जुमदार पाठविले,

यांजबराबरी रुपये ५००० स्वामीकडे पाठविले आहे. हे घेऊन पाव-लियाचें उतर पाठविलें पाहिजे. रुपयास बटा सहसा केला न पाहिजे. आम्ही स्वामीच्या पदरींचे असो. सर्व संकट आमचें स्वामीस आहे. रुपयास बटा न करावा. कर्जाचे रुपये काढून पाठविले आहेत, तरी सदरहू रुपये घेऊन जाब पाठविला पाहिजे. बहुत काये लिहिणें. लोभ असो दीजे हे विनति.

(5) Govind and Ramchandra Samraja had borrowed money for securing the mamlat of Andur. They sent Rs. 5000 to Vaidyas out of debt, incurred from them

---

No. 6 श्री

माघ व. ६।१६६८
जानेवारी २१।१७४७
ते ज्येष्ठ शु. १५।१६६९
जून ११।१७४७

हिशेब राजश्री बाळाजी बाजिराव प्रधान ड्डा सन सबा क्षय ता। प्रभव जेष्ठ सुा। १५ सुा। तिसा आर्बैन मया आलफ.

		यैन	व्याजदर,
क्षय			
माघ वद्य ६ तागाईत	प्रभव	५०००	१९०
जेष्ठ सुा। १५ मुा माहे	८३ ८२४.		
माघ वद्य ११ ता। मुा माहे	८३ ८१९.	९२५	३३॥≈
माघ वद्य ९ ता। मुा माहे	८३ ८२१.	७२७५	२६९८≈
फाल्गुन सुध १ ता। मुा माहे ३ रोज	८१४.	१२२५	४२॥.
फाल्गुन सुा ६ ता। मुा माहे ३ रोज	८९.	५७५	१९
		१५०००	५५४॥-

प्रभव संवत्छरे

गुजारत वेंकाजी ना। पोतदार
जेष्ठ सुा। १५ रुा। १५०००

बाकी व्याज प्रभव जेष्ठ शुध १५
विनसूट येणें. रु ५५४॥-

(6) An account of Nanasaheb Peshwe for money borrowed from Vaidyas in 1747 from January to June.

No. 7 श्री फाल्गुन शु. ५।१६६८
फेब्रु. ३, १७४७

श्रीमंत राजश्री बाळंभटबावा ता राजश्री विश्वनाथबावा स्वामीचे सेवेसी.

पो महादाजी कृष्ण व हरी कृष्ण सां नमस्कार विनंती. येथील कुशल फाल्गुन शुद्ध पंचमी जाणून स्वकीय लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेष राजश्री रघोजीबावांनीं रा रामचंद्रपंता कडून नालबंदीचा यैवज देविला, त्यासी चार महिने सेपनास स्वारानें सेवा घेतली; परंतु यैवज द्यावयास न फावलें. रा रघोजीबावा व रा कोन्हेरपंत यांची भेट जाहली. महिनाभर त्यांची सेवा केली; परंतु आनकुलता न जाहाली. समागमें जावें तर पुढेंही जानीचेमार्गीं साकडं, पांचसे रुा नकदी खर्चास तरी देणें, तेंही न जाहालें. गुदस्ता तीनसे रुपये नकदी समागमें होते, त्यांतें ठिकाणीं लाऊन सेपनास कर्ज घेतलें. सारांष पोटाचेच आनकूळ न जाहालें. दूर देश, खर्चाविना पंथ न चाले. उपवासी लोक न येत. नालबंदी तो राहिली. पोटास न मिळे. सविस्तर वृत्त राजश्री नारोपंतांनीं व शंकरांजी कान्हो वरकड ग्रहस्त आपणांकडील होते. रा धोंडोपंत, जाचकासमागमें होते. त्यांणीं रुबरू पाहिलें. यैसें साकडें जाणून निदान जाहालें यैसें आनकुळ आसतां जिवाचा नाश जाणून घरास आलों. लस्करास येतो म्हणून पत्रें आलीं होतीं. बंगाले यासि फौज गेली, आठ दिवस घाट झाडीचा. लस्कर जाई तोंवरी होतो. मार्गप्रतिक्षा पहात राहिलों. येणें न जाहालें. परस्तुन यावें तर गैर हंगाम. पुढें अखेरीस येऊन पोहचतों. ज्याचे सोबतीस कर्जदार जाहालों ते तो बंगालेयासि राहिले. भरंवसा जिवंत आहे म्हणून सैन्य आणावयासी गेले आहे. आलिया उत्तम आहे, याचा भरंवसा

दिसोन येत नाहीं. गृहस्तपणापासून दूर दिसते. स्वामींचा भरंवसा आहे, हरएक धंदा करून. देणेयापासून मुक्त करणार समर्थ स्वामी आहेत. पत्राचें उतर आलिया वर्तणूक करून. रा. कोनेरपंत देणेयाचें पुसतात, परंतु त्याचा निरवाह करून देणें, हा प्रसंग स्वामीवाचून होत नाहीं. बहूत काय लिहिणें कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

(7) Mahadaji & Haripant Kane write to Vaidya brothers that they do not intend to proceed with Raghuji in his invasion of Bengal as they are not getting the necessary money for meeting his own expenses and those of soldiers etc. They relied on Vaidya brothers for paying off the debt of Konerpant and other sawakars.

No. 8 श्री.

४ सफर.
फाल्गुन शु. ५।१६६८
फेब्रुआरी ३, १७४७

मोकदमानी कसबे भोरे ता रोहिडखोरें यासी.

आज्ञा केली येसी जें कसबे मजकूर, रा वेंकटराव गंगाधर याजकडे दुतर्फा मुकासा आहे त्यास त्यांणीं राजश्री बाळंभट व विस्वनाथ भट वैद्य यांजपासून कर्ज घेऊन यांस कर्जाचे यैवज फारिद होय पावेतों, कसबे मजकूर लेहून दिल्हा आहे, तरी मानिलेसी रुजू होऊन कसबे मजकूरचा दुतर्फा मुकासबाबेचा आकार होईल तो यांजकडील कमाविसदाराकडे सुरळीत वसूल देणें. वेंकटराव यांजकडे अगर त्यांणीं कोण्हासही यैवज दिल्हिया, येकंदर येक रुपया त्यांजकडे न देणें. जाणीजे छ ४ सफर सुरु सबा आर्बैन मया आलफ. याकडे वसुल देणें.

(8) It is an order to the Mokadam of Bhore of Bhor state that as the revenue of the Village is given to Vaidya brothers by Vyankatrao Gangadhar Hanumante till the debt borrowed by him from them is wholly paid, the revenue should not be given to him or his agents but to Vaidya's men, sent for collection. It is to be seen when this village was granted by Sachive to this family.

No. 9 श्रीशंकर फाल्गुन वा ५।१६६८
फेब्रुआरी १८, १७४७

राजश्रियाविराजित राजेश्री नारोपंत व केसोपंत का भुगांव गोसावी यासी.

सेवक विश्वनाथभट वैद्य नमस्कार. उपरी येथील क्षेम ता। फाल्गुन वद्य पंचमी पावेतों समस्त सुखरूप असो. यानंतर तुम्हांकडील वर्तमान कळत नाहीं, तर सविस्तर लिहिणें व राजश्री रघोजीबावा कडील सविस्तर वर्तमान लिहिणें. तुम्हांस सांगितल्या प्रों कामकाज करून व यादीप्रमाणें रुपये वसूल करणें. रा। आपाजीपंत सुभेदार यांजकडील व सदासीव हरी कडील व लोकांकडेस येणं आहेत ते वसूल करून सत्वर घेऊन येणें व पोतदारीचा यैवज वसूल करणें. रा। संकराजी कान्हो यांजकडील रुपये आले नाहींत, तर त्यास ताकीद करून रुपये सत्वर पाठवणें. गांवची लावणी करणें. रा। दुलभराम याचा मजकूर कसा काय जाला तो लिहिणें. राजश्री रघुनाथभट पटवर्धन यांजवळ रुपये दुलभरामाचा। पचतीस हजार मागणें. त्याजवर वरात आहे. मागोन घेणें. रुपयाचे जरूर फार आहे, तर रुपया यादीप्रों निकड करून वसूल करणें आणि हुंडिया सत्वर पाठवणें. तुम्हीही सत्वरच येणें. आमचीही रवानगी स्वामीनीं केली आहे. त्यास उष्णदेश व श्रीमंतांचे आगमनाचा विचार सत्वरच आहे, अैसें परस्पर वर्तमान येथंभूत ठीक नाहीं. याजकरिता हें पत्र तुम्हांस लिहीलें आहे. तर बावांस पुसोन कधी येणार व आम्ही कोठें यावें यैसें पुसोन सविस्तर वर्तमान लिहीणें. बहुत काये लिहीणें हे विनंती. आमचे नांवाचे कागद बावांस पाहिजे तर लिहोन देणें.

पैवस्ता चैत्र अधिक सुध येकादसी बुधवार.

---

(9) Vishwanathbhat was trying his best to improve Raghuji's relations with Shahu. The details given in this letter are very valuable. It seems, out of the money recovered as fine for Dulabharam, Vishwanathbhat was to receive Rs. 35000 through Raghunath bhat Patwardhan. Vishwanathbhat was asked by

Shahu to go to Raghuji in Berar at this time. But Raghuji intended at this time to go to Satara. He wanted to know the exact information about the departure of Raghuji as he was to avoid to go as far as Nagpur, the days being very hot. The whole letter is in the hand of Vishwanathbhat.

---

४ रबिलाखर
No. 10 श्री चैत्र शुद्ध ५।१६६९
मार्च ४, १७४७

चिरंजीव राजश्री **बालंभट** व **विश्वनाथ भट** व **बापू भट वैद्य** यांसी. **केसो बहिरव वैद्य** आसिर्वाद उपरी. येथील **कुशल** ता। छ ४ रबिलाखर मु॥ **पुणें** समस्त सुखरूप आसो विशेष. **गवाहागर** प्रांत **शामला** कडील **तुलाजी आंगरे** यांजकडे जाला आहे. त्यांस **नरवणच्या** वतनाविर्सी या समई खटपट केल्यास हस्तगत होय यैसें आहे, त्यास **गवाहागरच्या माहाजन कुलकर्णी** यांसी पुसिलें, त्यास त्यांणीं सांघीतलें कीं, आम्ही साक्षी जसी म्हणाल तसी देऊं. जें पूर्वी **वैद्यांचें** वतन होतें तें आम्हांस सर्वांस ठावकें आहे, तरी तुम्हांस वेदमूर्ती राजश्री **नारायेणभट** यांसी लिहिणें कीं, तरवणकर माहाजन व ग्रामस्त व ब्राह्मण यांसी पुसोन प्रेत्न करणें. तुमचे विचारें जर हें वतन हस्तगत, खटपट केल्यानें हाये यैसें आसिलें तरी आम्हांस बोलवाल तरी निरोप घेऊन येऊं. बहुत काये लिहिणें. हे गोष्टी विसीं अनमान करूं नये. हे आशिर्वाद. सौ **सरस्वती** व **उमास** व **लक्ष्मीस** आशिर्वाद. मातुश्री **सकुबाई** वहिनीस सां. नमस्कार.

---

(10) Keso Bahirav Vaidya requested Vaidya brothers to try to secure the Vatan of Narawan as the territory of Guhagar, in which it is situated, has come under the rule of Tuloji Angre. Bapubhat is the grandson of Shidambhat. Keso Bahirav is the grandson of Tanbhat.

No. 11 श्री अधिक चैत्र शु. ८,९।१६६९
रविवार मार्च ८, १७४७

श्रीमंत राजश्री बालंभटबावा व राजश्री विश्वनाथबावा वैद्य स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक केसो हरी सावरकर कृतानेक सिरसां नमस्कार. विनति उपरी येथील क्षेम ता। चैत्र अधिक सुध नवमी रविवार पर्यंत स्वामीचे कृपावलोकनें करून सुखरूप असे विशेष. ये प्रांतीचें वर्तमान तर श्रीमंत बाबासाहेब यांचे नागपुरी मुकाम आहे. आठा दिवसीं चैत्रवदी प्रतिपदेस स्वार होऊन सातारेयास येणार आहेत, यैसा करार आहे. वरकड श्रीमंत राजश्री जानोजीबावाबरोबर फौजा देऊन बंगालेयास रवाना केले, तें आपणास विदीत जाहालेंच असेल; परंतु सूचनार्थ लिहीलें आहे, यानंतर मौजे टेकाडीचें वर्तमान तर आपण च्यारसे रुपये त्यास देविले, त्याप्रों त्यास पावते करून कबज घेतलें. साल गु।।पैकीं बाकी पाटील मजकुराकडेस होती, ते बाकी च्यारसे रुपये त्याजपासून रामटेककरांनीं घेतले व सालमजकूरचे यैवजी रा। नाईकांची वरात सातसे रुपयाची होती, त्याकरितां गावावर बहुत उपद्रव केला. त्याविसीं श्रीमंतापासी विनति केली. त्यांहीं जबाब दिला जें, ते वरात मागील आहे, ते रुपये देणें. त्यावरून नाईकाचे चौघे माणसें गावावर येऊन बहुत दंगा केला. आण रुपयेयाची निशा करून घेतली. येकूण अकरासे रुपये त्याकडेस मौजे टेकाडीपैकीं वसूल गेला. बाकी राहिला तो सरकारांत येईल; व का। भुगांवचें वर्तमान तर गु।।प्रों रुपये वसूल होत नाहीं. पाच हजार रुपये पावेतों वसूल होईल. जाजती वसूल होत नाहीं, आण हजार पाचसे वसूल अधिक घेतालियानें पुढें इस्तमालत होणार नाहीं. पस्ट स्वामीस लिहीलें आहे. याजकरितां स्वामींनीं रागास न यावें. हे जागा स्वामींची आहे. ज्याप्रों स्वाम आज्ञा करितील, त्याप्रों वर्तणू(क) करून. परंतु पुढें का। मजकूरची इस्तमालत जाहालियानें साल मजकुरी वसूल कमी आला तर पेस्तर सालीं स्वामीची जागा राहोन येईल, याविसीं जे आज्ञा करणें ते केली पाहिजे. आम्ही सेवक आहों. जे गोष्टीनें साहेबांची किफाईत होईल तें करणें. यांजकरितां वारंवार विनंती

लिहितों. पुढें रयेत राहोन आली, लावणी उतम जाहाली, हें ही स्वामींची किफायतच आहे. त्यामध्यें जे आज्ञा येईल त्याप्रों वर्तणूक करून. वरकड सविस्तर दरबारचें वर्तमान रा नारोपंतांनीं लिहीलें आहे, त्यावरून सेवेसी विदित होईल. पोतदरीचें काम प्रस्तुत सुरू होण्यामध्यें आहे. स्वामींचे पुण्यप्रतापें करून पोतदारी चालती करीतच आहों. वरकड सविस्तर याप्रांतीचें वर्तमान राजश्री विठलपंत मुखवचनें सांगतां कळों येईल. बहुत काये लिहा कृपा निरंतर कीजे. हे विनंती.

---

(11) The movements of Raghuji towards Satara and of Janoji into Bengal are available in this letter and explain the situation as narrated in the Peshwa Daftar. Keso Hari Sawarkar, a Vaidya's clerk, has written all this information from Nagpur and explains how the revenue of Tekadi and Potadari amal can be recovered.

(शिक्का चौकोनी दुरेघी) श्री ९ रावल सबा आर्बैन

No. 12 अधिक चैत्र शु. १०।१६६९

मार्च १०,१७४७

तदा. मा.अनाम देशमुख व देशपांडे प्रो सुपे यांस चिमणाजी नारायेण सचिव सुहुर सन सबा:आर्बैन मया आलफ मौजे काराटी पा

श्री शंकराजी नारायण

मार सुहूर हा गांव राजश्री स्वामींनीं पेशजीच्या मुकासि याकडून दूर करून हालीं वेदमूर्तीं राजश्री बालंभट बिन रघुनाथ भट वैद्य गोत्र गार्ग्य सूत्र आश्वलायेन यास स्वराज्य- व मोगलाई दुतर्फा, देखील इनाम तिजाई व बाबती कुलबाब, कुलकानू, हालीपटी व पेस्तरपटी, खेरीज हकदार कदीम इनामदार करून, गांव यांस इनाम करून दिल्हा आसे. ये विशीं पत्रें सादर केलीं आहेत, तरी तुम्ही मौजे मजकूर वेदमूर्तींस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम सनदेप्रमाणें चालवणें. दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें. या पत्राची प्रती लेहून घेऊन आसल पत्र भोगवटीयास मारनिले जबळ परतोन देणें. जाणिजे छ ९ विलोवल पा हुजूर. (पत्रावधिरयं भाति) (मोर्तब चौकोनी दुरेघी) सुरूसुदबार.

(12) **This is an order of Sachiv to Deshmukh and Deshpande of Paragana Supa to execute the terms of the Inam Sanad of Karhati granted to Vaidya brothers by Shahu Chhatrapati. The Sachive has used the seal of Shankaraji Narayan. There is a similar order to the mokadam of Karhati which is not printed.**

No. 13 श्री वै. शु. ३ शके १६६९
मे १, १७४७

राजश्री **विसाजी रघुनाथ वैद्य** यांसी आज्ञा केली ऐसीजे, राजश्री **रायाजी भोसले** व **संताजी भोसले** हे उभयतां **वराड** प्रांतीं धामधूम करणार म्हणून हुजूर विदित जाहलें. त्याजवरून त्या उभयतांस हुजूर यावयाविसीं आज्ञापत्रें सादर केलीं आहेत. तरी तुम्ही त्यांस सांगणें तें सांगून **स्वामीसंनिध** घेऊन येणें, व राजश्री **रघोजी भोसले** सेनासाहेबसुभा यांसही यावयाविसीं आज्ञापत्र सादर केलें आहे. तरी त्रिवर्गास घेऊन तुम्ही हुजूर येणें. त्रिवर्ग आलियावर जे आज्ञा करणें ते केली जाईल. वरकड लिहिणें तें आलाहिदा पत्रांत लिहिलें आहे, त्यावरून कळेल. सत्वर त्यास घेऊन येणें. + त्रिवरघांस घेऊन येन. बहुत काय लिहिन.

\+ येथून पुढें शाहू महाराजांचें हातचें अक्षर आहे.

(13) This letter proves Shahu's concern in the family dissentions of Raghuji, Rayaji and Santaji. He orders Vishwanathbhat to bring to his presence all the three at Satara. The last sentence which ends the letter is written by Shahu himself.

No. 14 श्री वैशाख शुद्ध १०।१६६९
मे ८, १७४७

श्रीमंत राजश्री **बाळंभटबावा** व तथा राजश्री **विश्वनाथबावा** स्वामीचे सेवेसी,

आज्ञाधारक **संकराजी कानो** साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तमान ता। वैशाख सुध दशमी मु॥ **नागपूर** जाणोन यथास्थित असो विशेष. स्वामींनीं कृपादिष्टी करून, पत्र राजश्री

विसाजीपंत खासनीस यांच्या जाबुदा बराबरी पाठविलें, तें उतम समई प्रविष्ट होऊन बहुत संतोष जाहला. यैसाच सेवकाचा परामृप हरघडी घेत आसिलें पाहिजे, विशेप. येथील वर्तमान श्रीमंत **राजश्री बाबासाहेब वैशाख सुध** पंचमीस स्वार होऊन **वराड** प्रांतास गेले. तेथून **समसरूसीस** जाणार. त्यांस **पोतदारींचा** व रा **दुलभरामाकडील** वरातेचा मजकूर तरी रा **नाना** व आम्ही दोन महिने **श्रीमंतापासीं** संध्याकाळींसकाळीं हटकीत होतो जें, **दुलभरामाकडील** रुपये मना केले त्याची वाट काय? त्यास **श्रीमंत** बोलत जे, आज उद्यां विलें लावितों. यैसें बोलत. त्यास काम विल्हें लागेना. मग राजश्री **नाना** स्वार होऊन गेले. मग आम्ही पंधरावीस रोज हमेशा दरबारास जात असतां, आतां घटलों यैसें म्हणत होते. मग पंचमीस स्वार होऊन गेले; ते समयीं बराबरी **व्याहाड** पावेतों समस्त मुछेदी गेले, त्याबराबरी गेला. सार्‍यांस आज्ञा होऊं लागली, ते समयीं पुसिलें, तेव्हां हातीं धरून राजश्री **बगोजीपंताचे** हातांत हात व राजश्री **तुळजोपंतदादाचे** हातांत हात घालून सांगितलें जें, सेकडा येक रुपया प्रमाणें **पोतदारींचा** अमल खामखाय चालीस लावणें. त्यांस मी अर्ज केला जे, सनद सेकडा रुा. २ प्रमाणें आहे. त्यास सनद पाहूं यैसें बोलिलेवरी सनद रा **केसोपंतापासीं** कुल सनदा आहेत, त्यांस **भुगाव** सुटत नाहीं, सनदाही आम्हापासीं देत नाहीं. तेव्हां आम्ही श्रीमंतापासी बोलिलों जें, सनद विराडीं राहिली. मग बोलिलें कीं, अमल चालीस लागो दे, मग आम्ही **सातोरयासीं** जातों, मग **विसोबांची** भेट घेऊन मागून दोन रुपये सेकडा यैसी सनद पाठवून देऊन. यैसें बोलिलें. मग **दुलभरामाचे** रुपयाचे पुसिलें, ते [व्हां] जाब दिला जें, राजश्री **विसोबाची** भेट घेऊं आणि रुपये तेथंच देऊं. तू [तें] **पोतदारींचा** अमल सेकडा रुपया प्रमाणें करणें. यैसें वर्तमान जालें. **भुगावचें** वर्तमान तरी राजश्री **केसोपंती** खाचर नेविलात रुा ५० पनासाचें व बइल रुपये पंच्यासी व सामानसुधां दीडसे रुा लावून खाचरांत बसोन **गांवास** विडे द्यावयास जात होते; त्यास खाचर उलटलें, आणि मोडलें, खालें पडलें हात मोडला. यैसें वर्तमान गावचे लोक *हाटास आले, ते सांगत होते. **बुलाजींचे** येकच लेक होता तो देवींनीं मृत्य पावला.

पुढार श्रीमंतांचे सेवेसी,

विनंती उपरी. त्यामुळें झुलाजी बहुत श्रमी आहे. त्याचे समाचारास गेलों. येकादसीस गेलों. स्वामीस विदित व्हावें, याकरितां सेवेसी लि।आहे. नागपुरची सनद दरबार खर्चाची फिरली. हिसेबी मजुरा दिली नाहीं. राजेश्री आपाजीपंत सातारा बरावरीं गेले आहेत. चांद्याच्या सनदा अगदीं फिरल्या. हिसेबी मजुरा नाहीं दिल्या. मोहनसिंगाकडीलही फिरल्या. जेवढी सनद आपण दसर्‍यांत घेतली. तेवढी सनद गैरमजुरा पडली आणि फिराफिरो(न) टाकिल्या. मागाहून जासुदाहातीं पाठऊन देतों. आम्हांस यंदा कांहीं पावलें नाहीं. आपणावरी स्वामींची गैरकृपा व चाकरी तो मजवरी पडते. तें सर्वास ठाऊक आहे आणि आपणांसही विदित आहे. मी बहुतदां लिहीलें जें, अमिली असामी भुगावची नाहीं. हमेशा भुगांव सुटत नाहीं. ख्याल तमासे होत असतात. आम्ही तो भुगांव टाकिलें. तें वर्तमान नानास विदित आहे. याप्रांतीं आपणांकडील **काचील कोणी नाहीं. या करितां राजश्री नानास भुगाव, टेकाडी, मवाड सर्व धंद्यावरी पाठविले पाहिजे. तेणेंकरून हजार दीड हजार रुपये ज्याजती पैदास्त होईल, आणि बंदोबस्त अगदी होईल. स्वामींच्या विचारें होईल तरी बरें, नाहींतरी स्वामी खावंद आहेत. स्वामींनीं आपणास जे आज्ञा केली आहे, त्याप्रमाणें करीत असो. देवगड प्रांत व वराड प्रांत राजश्री तुलजोपंताचे हवाले केले आहे. आमच्या आसाम्या तीन आहेत, त्या दोन खर्यों करून घेतल्या. वकिली व दप्तरदारी दोन्ही घेतल्या. चांद्याच्या असाम्या अगदीं दूर जाल्या. राजश्री नेगीकडील वर्तमान पत्रीं स्वामींनीं लिहीलें जें, हुंडनावल खेरीज नेगीनें देऊं केली व व्याज रुपये सातारा पोंचेतां पावेतों, यैसें लिहिलें. तरी राजश्री नाइकाचें पत्र नाइकास दिलें. त्यांणीं जाब दिला, जी, दुबारा हुंडनावल कोण देईल ? हे कोठील सावकारी ? व व्याज येथें रुपये जमे करून देतील. सातारा पावेतों कोणी देणार नाहीं. त्यांणीं इस्तकबील पासून व्याज धरिलें. तुटमुदतीनें दिलें. रुपये त्यापासून ६७२ साहासें बाहातर रुा व्याज केलें. त्यापैकीं च्यारसे रुा पावले. बाकी रुा २७२ दोनसें बाहातर राहिले, ते घेऊन खत द्या म्हणतात. नाहींतरी आम्हांस रुपया मिळत

नाहीं. त्यास स्वामींनीं काय आज्ञा ते केली पाहिजे. बहुत काये लिहीणें. सेवकावरी लोभ असो दिला पाहिजे. हे विज्ञापना.

राजश्री रामचंद्रपंताचे सेवेशी संकराजी कान्हो साष्टांग नमस्कार. लिा परिसिजे, लोभ असो दीजे हे विनंती.

---

* बाजार. ** कर्तबगार, हुशार.

(14) Raghuji Bhosle starts for Satara with his son Mudhoji as explained in another letter. There was a move on Shahu's part, to adopt him. The letter also contains information about the management of inams by Zulajipant, Keso Hari Sawarkar, Tuljopant and the recovery of money from Negi and the news of the death of the only son of Zulajipant.

———

No. 15

श्री

शके १६६९
सन १७४७

तहनामा सरकार राजश्री फत्तेसिंग भोसले सुरु समान आर्बैन मया आलफ

मा। वराड येथें आमचे वाटणीचा सरंजाम आहे त्यापैकीं रा। रायाजी भोसले यांच्या वाटणीचा सरंजाम आहे तो वजा करून बाकी महालामध्यें पादपाडे आम्हीं घ्यावें बाकी राहिले महाल निमे तुम्ही घ्यावें, निमे आम्ही घ्यावे. कलम १

\+ + + +

जामाचे घ्या + + +

निमे आम्ही घेउं कलम १

संस्थान चंद्रपूर यापैकीं महाल तुम्हांकडे राहिले मुकरार बीा तपसील.

१ पा। वैरागड	१ पा। ब्रम्हपुरी
१ पा। उमरेड	१ पा। चांदूर
१ पा। पवनी	१ पा। प्रतापगड
१	१
१	१

१०

राजश्री कानोजी भोसले यांचे कारकीर्दीस कदीम संस्थानें मजमू दफ्तरीं वाटण्या आहेत. बी ता १ प्रांत गढे १ सरकार बांदिया १ पा वाडीचेनसें १ सा गणोरें १ संस्थान मांडवगण १ संस्थान धामोणी

एकूण दहा माहाल वजा करून बाकी संस्थानेदिकांचा तह चालत आहे त्या प्रमाणें चालवावा. बाकी संस्थानसुधां गढ्या व कोट व किल्ले जे संस्थानाखालें राहिले असतील ते आम्हांकडेस द्यावें. कलम १

तुमचा सरंजाम संस्थानें बी तपशील.

१ सुभा बंगाला देखील मकसुदाबाद

---

(15) This is a treaty between Fattesing Bhosle and Raghuji Bhosle in which the territories assigned to them are given.

No.16

ज्ये शु. १।१६६९
मे २९,१७४७

श्री

राजश्री बाळंभटबावा व राजश्री विश्वनाथ वैद्य गोसावी यांसि

दाा अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रो पदममोजी जाचक दंडवत. विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करवीत गेलें पाहिजे. विशेष आपण पत्र पाठविलें तें प्राा होऊन लेखनार्थ सविस्तर कळोन बहुत समाधान जाहालें. लिहिलें कीं, चिरंजीव राजश्री आनंदराव यास कोण्हीकडे हेलपट्यास पाठवावयाचा आणविलें नव्हतें. सेळके यांच्या कजियाबद्दल आणविलें होतें. त्यास कजियाचा निर्गम जाहला व राजश्री रघोजीबावा भोसले यांसही श्रीमंत महाराज राजश्री स्वामींनीं आज्ञा देऊन वस्त्रें दिल्हीं. हेही जेष्ठ शुध प्रतिपदेस स्वार होणार,

२...

येथून स्वार जाहल्यावरी तुम्हांस पत्र जाईल. तेणें प्रों विचार करणें म्हणोन लिहिलें तें कळलें. यानंतर राजश्री रघुनाथजी भोसले यांचे नालबंदीचा यैवज रुपये दोन हजार आद्याप हातास येत नाहीं हालीं रा बाजी विठल यांणीं लिा कीं, एका दोन रार्जी चिठी द्यावयाचा करार जाहाला आहे म्हणोन. तरी आपणासारिखे आमचे मुरबी असतां दोन हजार रुपये ते काय? आणि येवढे मातबर दरबार व आपणही मातबर. मातबर कामें कितेकांची करीत आले व पुढेंही याजहून अधिकोत्तर करणार यैसा विचार असोन, लघु कार्याची तर्तूद होऊन न ये हे गोष्टी अपूर्व आहे व तुमच्याच भरवसेयावरी आम्ही बेफिकीर राहिलों. व आजि उद्या यैसें म्हणतां, तीन महिने जाहाले. तरी हालीं आपणास लिा आहे तरी जैसें कळेल तैसें युक्तीनें यैवज हाताखालें घेऊन मारनिलेस मार्गस्त होत, तें केलें पाहिजे व आमचेही नालबंदीचें कापड दोन हजार रुपयाचें येणें आहे तरी राजश्री बाबा साहेबांस सांगोन सदरहू कापड करारा प्रों देविलें पाहिजे. आमचा वोढीचा प्रसंग आहे, कापड कोठें मिळत नाहीं. यैशा प्रसंगीं कापड देविल्यानें लोकास द्यायास कार्यास येईल, हें जाणोन लिहिलें आहे. तरी लिाप्रमाणें रुपये दोन हजार व आमचे कापड पदरीं पडे, ते गोष्टी केली पाहिजे. विस्तार ल्याहावा यैसें नाहीं. सर्व आपणांस विदित आहे. बहुत काये लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंती.

---

(16) Padmoji Jachak writes to Vaidya brothers to pay to Raghunathji Bhosle Rs 2000/- the nalabundi allowance as early as possible and so also to ask Raghuji Bhosle to pay the writer his nalabundi amount in the form of cloth. In this letter it is stated that Raghuji was allowed permission by Shahu to go to Nagpur. He means to start on 29th of May. It should be determined how the Jachak family was related to Shelke family

४८

No. 17

जेष्ठ शक १६६९
श्रीरामचंद्र जून सन १७४७

सकलगुणपरिपूर्ण राजमान्य राजश्री **बाळंभट** व **राजश्री विस्वनाथ भट वैद्य** स्वामी गोसावी यांसि.

पोष्य **भगवंतराऊ रामचंद्र** कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत गेलें पाहिजे. विशेष राजश्री **सिवाजीपंत** याचो पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान भावार्थ कळों आला. यैसीयासी **थोरले माहाराज** हिंदुपदपादशा समर्थ, राजेलोक आहेत. आम्ही ब्राम्हणलोक च्यारपाच पिढ्या या राज्यांत वडीलवडिलां तो माहाराजांचे पाय, हें वतन जोडलें. याजस्तव वारंवार अर्ज विनंती लिहीत आलों. दोनच्यार वेळा भेटीस सनिध गेलों; परंतु **महाराजांनीं** कृपा करून आमची दाद केली नाहीं, अथवा अर्ज विनंती चालविली नाहीं. वरकड सरकारकून आहेत ते श्रीमंत लक्ष्मीवंत आहेत. त्यांस आम्हांलोकांचें आगत्य नाहीं. **माहाराजांस** करुणा येईल तरीच आम्हांस अन्नवस्त्र देऊन सांभाळ करितील. तुम्ही आमचे दरबारी मध्यस्त आसोन कांहीं कार्यभाग करून दिल्हा नाहीं. यंदा लोकापवादास्तव **थोरले माहाराज** यांणीं व दिवाणानीं **कोलापूरचे माहाराज** यांसि उपदेश केला, यामुळें आमच्या घरास **येऊन श्री** देवाच्या उत्छाहांत बोळीचाली करून शफत देऊन, *मेहमानी घेऊन आदरें समागमें **कोलापुरास** घेऊन गेले. दीड माहिना **धा॑ ्या** संनिध राहिलों. दरबारचा रंगरूप वास, येश, कीर्ति विचार पाहिला. खासा **धणीयांसी** व **साभाग्यवती बाईसाहेबांस** घोडे दोन व वस्त्रंभूषणें दिलीं. कर्जदार जाहालों. अर्जविनंती करणें ती केली, वडिलार्जित सरंजाम, बाबती व खेडीं, वतनी द्यावी आणि वडिलाप्रमाणें दया करून सेवा घ्यावी यैसी विनंती केली. राजश्री **गंगाधर** पंडित **विशाळगडाहून धणीयांनीं** बोलाऊन आणिलें होतें. आठपनर दिवस राहिले, उभयता सरकारकून मेळऊन धणीयांनीं आज्ञा केलीजे, कागल घ्यावे. **चिकोडी** घ्यावी. ****काटक** मोडावं, **घोरपडे** मोडावें,

---

* पाहुणचार, आदरातिथ्य, ** गळेकापू, बेरड.

मनसबे करावे, यैसा हुकूम जाहाला. आम्ही उतर दिलें जें, वडील वडिलांपासून येरुतीयार देऊन दया करून चालविलें, त्याप्रमाणें साहेबीं सेवा घेतालिया कालानरूप सेवा घडेल. त्यास हजीर आहों. त्यास सौ. बाईसाहेबांस ती गोष्ट मानली नाहीं, बोलीप्रमाणें परिणाम नाहीं. मग राजश्री आपा प्रतिनिधी यांस शरीरीं बरें वाटत नाहीं, यामुळें राजश्री गंगाधरपंत निरोप घेऊन विशाळगडास गेले. आम्ही दरबारीं मागें राहिलोंच होतों. आम्हांकडील बोलीचालीचा प्रसंग, सरंजाम खेडीं देत नाहीं, यैसें जाहालें. मग निरोप घेऊम आम्ही घरास आलों. आवघें राज्य, कोट, किले व ठाणीं राजश्री अर्जोजी यादव यांचे स्वाधीन आहेत. राज्यभार यादवावर आहे, ते करितील तें होईल. आम्ही ब्राम्हण लोकी काय करावें? धणियांसी स्वार्थापुढें परमार्थ आठवत नाहीं. येशकीर्तीचें आगत्य नाहीं. राज्यांतील कदीम पाया मोडिला. राजधर्म मोडले. स्वधर्म बुडाले. आम्हा लोकांचा कंटाळा सौ बाईसाहेबास आला आहे. द्वेष करून इतराजी धरिली आहे. राजश्री आर्जोजी यादव *इतबारी, विश्वासू जाहाले आहेत, खासा महाराजांचें कांहीं सत्तास्वामित्व चालत नाहीं. यैसी बेदाद जाहाली आहे. राजश्री गंगाधरपंतीं सातारियासी बोलीचाली करून राजश्री श्रीपतराऊ. यांचे विद्यमानें मनसबा केला. सिरोळचें ठाणं मागोन घेतलें. राजपत्रें व हुजरे आले. सेवटीं फजित पावोन माघारे गेले. लोकोत्तर अपकीर्ति जाहाली. तैसी गत आमची होईल. यैसा विचार पाहोन आपली इजत राखोन काळ घालवीत आहों. सविस्तर थोरले माहाराजांस येकांतीं विदित करणें. राजश्री अपा प्रतिनिधी यांणीं कैलासवास केला. राजश्री श्रीपतराऊ प्रतिनिधी वारणे पर्यंत येऊन माघारे गेले. क्रियाकर्म जाहालियावरी राजश्री गंगाधरपंत सातारियासी राजश्री राऊ प्रतिनिधी याकडेस येणार आहेत. तेथें बोलीचाली होऊन काय मनसबा होईल तो पुढें कळेल. कोलापुराहून धणियांचीं पत्रें घेऊन रखोजी जाधव, थोरले महाराज यांकडे गेले आहेत. त्यांचा भावार्थ तुम्हांस कळलाच असेल. आलीकडेस कागलकर घा यांणीं +आंगेजणी करून यादवांचें ठाणें मौजे रुई येथें होतें, तें घेतलें-

* प्रामाणिक + उठावणी, पराक्रम

कोल्हापूर हवेलीतफेंचीं गुरें नेलीं, यैसा रयतेवर कहर जाला आहे. कागलकर घाटगे वतनदार. यांचीं खेडीं ठाणीं देत नाहीं, यामुळें अपाय होत आहे. किरकोळ वतनदार यांचे उछेद जाले. वतनें दिवाणांत ठेविलीं. सांगितलें यैकत नाहीं. दरबारीं अर्जे चालत नाहीं आम्हांजवळ राजहौंस किला सौ बाईसाहेब मागत आहेत. रांडा पोरें ठेवावयासी कोठें जागा नाहीं. भूदरगड, समानगड, वलभगड, तोरगल आदिकरून सिंदे यांचे स्वाधीन आहेत स्वराज्य यादवांचे स्वाधीन आहे. आमचा × × × + करतील तें होईल. कृपा करणें हे विनंतीपूर्वं विदित करून उतर पो. आज्ञा होईल त्या प्रों राहाटी केली जाईल. आम्ही ब्राम्हण लोक अनाथ जालों. पोटास नाहीं. हुजूल.

+ पुढील अक्षर भगवंतरावाचें आहे.

(17) Bhagwantrao Amatya writes to Vaidya brothers that Sambhaji Raje of Kolhapur attended the Ramnavami festival at Bawada and took him to Kolhapur. But he was not given his vatan. S. Jijabai, the queen, asked Gangadharrao Vishalgadkar to capture Kagal and to defeat Ghorpade. In the meanwhile Tryambakrao alias Appa Pratinidhi died. Kagalkar Ghatge took the village of Rui of Arjoji Yadav and greatly troubled Kolhapur subjects. He was predominant at the Kolhapur Darbar. S. Jijabaj was demanding from Amatya the Rajahansa fort. (राजहंस किल्ला) (see in P. D. 26 Arjoji's letters.)

No. 18 श्री+रामचंद्र जेष्ठ १६६९
जून १७४७

सकळगुणपरिपूर्ण राजमान्य राजश्री बाळंभट व राजश्री विस्वनाथ भट वैद्य स्वामी गोसावी यासी.

पोष्य भगवंतराऊ रामचंद्र कृतानेक नमस्कार विनंती. उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे विशेष. आलीकडे तुमचें पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. यैसें नसावें. निरंतर पत्र पाठवीत असिलें पाहिजे. चिरंजीव रा सोनोपंत व रा संभाजी पडवळ तुम्हांकडे व राजश्री बाबूनाईक श्रीमंत रा रघोजी भोसले याक-

डेस पाठवीले होते. नालबंदीच्या, × × × दरबारीं तुम्ही. × × × आगत्य कोणास नाहीं. कर्जदार जाहालों. सर्वस्वी आ. ×, केला + दुख कोणास सांगावें ? अन्नवस्त्रांस माहाग जालों. तुमचे वडिली इनाम शफत दिली, व तुम्ही दिली, त्याचा विसर पडला. या राज्यांत आंधार पडला. बाईसाहेब व यादव करितील तें होईल. आवघे भिकेस लाविले. रा रखोजी जाधव सातारा माहाराजाकडे पा आहेत. तेथून आज्ञा आलिया खासा राजे भेटीस जाणार. आजम निजाम किलीजखान यांजकडे पत्रें वस्त्रें देऊन दतप्रभू व रानाजी लिंधे पा आहेत. खल राजकारण होत आहे, अवघा कारभार कपटी आहे. माहाराजांस श्रुत येकांतीं करणें, आमचा धावा करवणें. माहाराज थोरले भोळे आहेत. दयेनें कल्याण करावें, हें आमचें मनोगत आहे. विश्वासघात त्याचा मनांत नाहीं. या राज्यांत अपायाची गणना धरीत नाहीं, यैसें आहे. हें पत्र वाचून फाडणें हे विनंती हुजुल.


+ पुढील मजकूर भगवंतरावाच्या हातचा.

(18) Bhagawantrao Amatya writes to Vaidya brothers the activities of Sambhaji of Kolhapur, S. Jijabai and Arjoji Yadav. They are securing the cooperation of Naizam and Raghuji Bhosle. Sonopant appears to be the nearest relative of Bhagwantrao. (See letters in P. D. vol. 26)

No. 19 श्री २१ जाखर

जेष्ठ वा ८।१६६९

पेशव्यांचा शिक्का व मोर्तबपिंपळपानी जून १९, १७४७



दस्तक सरकार राजश्री पंतप्रधान ता कमाविसदारान व ठाणेदारान व चौकीदारान व नदीउतारेयान व बाजेलोकान, जकातीमहालानिहाये सुा समान आर्बेन मया अलफ. राजश्री स्वामींनीं राजश्री विश्वनाथभट वैद्य यांस राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा यांजकडे रवाना केलें

असेत. या समागमें हत्ती १ व घोडीं व पालखी व *पडतळें वगैरे+ भारबारदारी आहे, त्यांस मार्गी कोणी मुजाहिम न होणें. ×बादरका देऊन आपलाले हदेनें पोहचावणें, हरयेक जागा नदी गांव *टोकरीयावर उतरून पार करणें. जाणिजे छ २१ जमादिलाखर पा। हुजूर. (लेखनसिमा)

* बाडबिछावत + लवाजम्यासह × संरक्षणासाठीं शिपाई * पलीकडे.

(19) Elephants were sent to bring Raghuji and Mudhoji in procession to Satara for which this permit was granted by Peshwa to Vishwanathbhat Vaidya.

श्रीरामोजयति २७ जा। खर

No. 20 जेष्ठ वध १४।१६६९

जून २५, १७४७

श्रीमंत राजश्री रघुजीबावा भोसले गोसावी यांसी.

श्रों खंडोजी गोगवले हवालदार माहालभांडारग्रह रामराम विनति उपरी. बा। यैवज प्रांत मकसुदाबाद वगैरे सालिना तीन लक्ष. पैकीं देणें अनुष्ठान आचरे नि। राजश्री बालंभट वैद्य रुपये ३६०० छतीससे देऊन पावलियाचें कबज घेतलें पाहिजे. तेणेंप्रों मजरा असे. छ २७ माहे जमादिलाखर सुा सम्मन आर्बैन मया अलफ हे विनति (लेखनसिमा).

(20) Khandoji Gogawale an officer of the Maharaja's Khajgi (private) treasury, asks Raghoji Bhosle to pay Rs. 3600 to Balambhat Vaidya who was asked to perform Anusthan at Achre in Konkan, out of the 3 lacs due from him as a yearly payment for the Murshidabad province etc.

छ. १० रजब

No. 21 श्री आषाढ शु. १३।१६६९

जुलै ८, १७४७

राजश्री विस्वनाथबावा वैद्य गोसावी यासी.

दा। अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रों शाबाजी भोसले

दिा पागा राजश्री सेनासाहेबसुभा दंडवत. विनंती उपरी. येथील कुशल ता छ १० माहे रजब परियंत मुा नागपूर जाणून स्वकीयें स्वानंद लिहीत असिलें पाहिजे. विशेष कृपा करून पत्र पाठविलें तें उत्तम समई पाऊन, लिहिला आर्थ विदित जाहाला. नरखेडच्या रुपयाचा मजकूर लिहिला. तेथील वर्तमान कीं, ये प्रांतांस आलजपूरचे सुब्याची फौज आली ते समई त्या येवनांनीं नरखेडचें ठाणें घेतलें. जमीदार दलेलभोर स्थळ भ्रष्ट केला, तो आद्याप बाहीर बाहीर फिरत आहे. ज्याचे नांवें कारभार करून चुकोती केली, त्याचें स्थळ उछेद जालें, याजमुळें आम्ही तुमचे रुबरू गोसावीयाचें कर्ज काहाडून तीन हजार रुपये रा। बनाजीपंत बक्षीस दिधले होते, ते उगवणी जाहाली नाहीं. गोसावी प्रत्यक्ष आहेत. त्याजवर ते स्थळीं बहादुरजी भोर आला आहे. ठाणें तो मोगलाचें आहे. त्यास आम्ही येते वेळेस त्यांची भेटी घेतली. त्यांनीं करार केला कीं, लावणी जालियावर हंगामी निरगत करून देऊं, याजकरितां तुम्ही आपले कमविसदारास येक पत्र लेखन करणें कीं, फुरसतीणें इलाजें कार्य उगऊन घेणें. रोज तगादा करितां, ती तें न करितां तुम्ही लिहिल्यावर फिकीर करावी यैसें नाहीं. पूर्वस्मरण आम्हांस दृढतर आहे; परंतु यैसा प्रसंग त्याचा जाहाला, म्हणून दिवसगत लागली आहे. +सेवेसी विदित जालें पाहिजे. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

\+ येथून पुढें लेखकाचें अक्षर आहे.

(21) Shabaji Bhosale, an officer of Raghuji, managing paga of horses, writes to Vishwanathbhat Vaidya, that Dalel Bhor, Jagadeorao, the Jamindar of Narkhed, was ousted by the Mohamedan army of the Subhedar of Ellichpur and he did not return yet. Bahadurji Bhor is in management of his property. He promised Shabaji to pay the amount in the reaping season.

No. 22 श्री आषाढ शुध १२।१६६९
जुलै ८, १७४७

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथबाबा वैद्य** स्वामीचे सेवेसी.

सेवक **तुळजोराम** सां नमस्कार विनंती. उपरी येथील ता आषाढ सुध १२ मुा **नागपूर** जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष बहुत दिवस स्वामीकडील पत्र येऊन वर्तमान कळों येत नव्हतें. तें त्यास हाली राजश्री **चिंतोपंता**समागमें कृपा करून पत्र पाठविलें, त्याजवरून व मारनिलेचें मुखोतरावरून सकल अर्थ कळोन बहुत समाधान जाहालें. तेथें आपले रुपयाचा व **पोदारीचा** वगैरे कितेक अर्थ लिहिला. यैसीयासी गतवर्षीं वोढीचा प्रसंग जाहाला. तो स्वामीस विदितच आहे. येदंनिमित्य यैवज राहिला. यंदा रा **संकराजी कानोचे** मातीनें गतवर्षींचे रुपयांच्या वराता करून दिल्या आहेत. वसुलाचा हंगाम समीपच आला आहे. त्यास ते रुो सत्वरच वसूल होऊन सेवेसी पोचतील. यंदा श्रीमंत राजश्री **बाबासाहेबीं** राजश्री **साबाजीबाबा**पासीं ठेऊन येथील कामकाज गला घाळून कितेक लोकांचे हवालेटवाले करून वोढीमध्यें घातले; आणि आपण कूच करून गेले. यैसी यासी **श्रीमंतांच्या** आपल्या भेटी होतील परस्परें सकल अर्थ कळो येईल. तदनंतर जें साहित्य करून अभिमान धराल तो थोडका आहे. सर्वस्वें स्वामींचा भरवसा पूर्ण चितांत धरून निश्चिंत असो. द्वैतता न धरावी. यानंतर **पोदारीच्या** गुदस्ता व सालमजकूर यैश्या दुसाला ताकिदा पाठविल्या पाहिजेत. त्याप्रमाणें कार्यभाग होऊन येईल. दरबारचे कामकाजाविसीं स्वामींचे भरवासियावरी निश्चिंत असो. वरकड तपसील वर्तमान राजश्री **केसोपंतांनीं** लिहिलें आहे, त्याजवरून कळों येईल. विशेष काय लिहिणें लोभ असो दीजे. हे विनाति.

---

(22) Raghuji's movements and doings are herein stated to Vishwanathbhat by Tuljoram from Nagpur.

No. 23 श्री+बालकृष्ण छ २० साबान

मोर्तब वाटोळा श्रावण वद्य ७।१६६९

दुरेघी आगष्ट १६, १७४७

श्रीमत् सौभाग्यादिसंपन्न मातुश्री **बाईसाहेब** यांणीं राजश्री **विश्वानाथभट वैद्य** यांसी आज्ञा केली ऐसीजे, तुम्हांस हुजरून राजश्री **रघूजी भोसले सेनासाहेबसुभा** यांजकडे रवाना केलें, तेव्हां राजश्री **सुलतानजी देशमूख पाा मान** यांचे विसीं जे आज्ञा करणें (ती) करून **फकीरजी** बराबरी दिल्हा, आणि काम विल्हें लावणें, म्हणून सांगितलें असोन त्याजकडील गुंता माारानिलेचा अध्यापी विल्हें लावीत नाहीं म्हणून हुजूर विदित जाहालें, त्यावरून त्याला आलाहिदा आज्ञापत्र सादर करून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी पंशजी त्याला पत्र सादर केलें आहे त्याप्रमाणें देशमुखाचे गुंते विल्हें लाऊन देवणें. वारंवार त्याचा बोभाट राजश्री **स्वामीकडे** जातो आणि राजश्री **स्वामी साहेबांस** आज्ञा करितात. आणि ते साहेबांचे आज्ञेप्रमाणें विल्हें करीत नाहीं. येणें करून राजश्री **स्वामीस** विषाद येईल. या गोष्टी त्याला बरें रीतीनें मायावादाच्या सांगोन त्याजकडील जे मुदे असतील ते फैसल करून देवणें. फिरोन याचा बोभाट आलिया कार्याचें नाहीं ये विषई राजश्री **स्वामींनीं** तुम्हांसही रुबरू सांगितलें होतें, तेणेंप्रमाणें त्याचा गुंता विल्हें करून देवणें. जाणिजे. + छ २० शाबान बहूत काये लिहिणे. (मोर्तब—लेखनावधि)

+ पुढील मजकूर राणी सकवारबाईचे हातचा असावा. पत्राच्या मागें 'सही' असा शब्द लिहिलेला आहे. असाच तिच्या इतर पत्रावर आहे

(23) The queen, S. Sakwarabai, orders Vishwanathbhat Vaidya to recover money from Sultanji Deshmukh told by Maharaja at the time of his departure to a Ngpur. The last line of the letter seems to be written by S. Sakwarbai and also the word 'सही' on the back of the letter.

No. 24 शिक्का व मोर्तब वाटोळा दुरेघी फारसी श्री छ. २ रमजान भाद्र. शुध ४।१६६९ आगस्ट २८, १७४७

रोखा धनिको नाम विस्वनाथ वैद यांसि उधारनिकोनाम रा राजे बुऱ्हानशाहेजी राजे पारांती देवगड सां १८०३ वां करने येसाजे रोखा लिहून दिधल येसाजे. आपन तुमचें कर्ज मागितलें मुदल रुपये नाने पाच हजार ५०००८ हे रुा येका महनयांत रुपये आपन देऊन. हा रोखा आपली सही धर्मा बगूजी नेगी ता स्वयानक. तो छ २ सुध भाद्रपद (मोर्तब).

(24) This is a conveyance deed passed by Burhan Shaha Raje of Deogad in favour of Vishwanathbhat for a debt of Rs. 5000 to be returned in a month.

No. 25 श्री छ. ७ रमजान भाद्र. शुध ९।१६६९ सपटंबर २,१७४७

श्रीमंत सौभाग्यादिसंपन्न बाईसाहेब यांणीं राजश्री विश्वनाथ भट वैद्य यांसी आज्ञा केली ऐसिजे. राजश्री आबाजी सखदेव यांचे मामा राजश्री कृष्णाजी भास्कर यांजला मशारनुलेंनीं मधस्त होऊन सरकारांतून कर्ज घेऊन रुपये मामल्याबद्दल दिल्हे आहेत. ते अद्याप न उगवतां कृष्णाजी भास्कर यांसी देवआज्ञा जाहाली. त्यांचें घर नागपुरीं आहे. त्यांची वस्त्र भाव घरची आणावयास हुजुरून राघो अनंत व रामचद्र काले त्यांचे भाऊ, व सरकारचे हुजरे पाठविले आहेत. कर्जाविसीं व वस्त्रभावेविसीं राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा यांसीं पत्र सादर आहे. तरी तुम्ही प्रसंगीं आपले आहां, तरी त्यांस विचारे करून सांगोन कर्जाचा ऐवज खताप्रमाणें निकाल करून पाठवणें. त्यांची घरची वस्त्रभाव सुतळीचा तोडा * जराबाजरा पाठविले आहेत. यांचें स्वाधीन करणें. सरकारचा ऐवज सेनासाहेबसुभा यांजकडून उगवे तें करणें. जाणिजे. छ ७ माहे रमजान बहुत काये लिहिणें. सही. रुजू. सुरूसुदबार.

* किरकोळ वस्तु. + पुढील मजकूर राणीचे हातचा.

(25) The queen S. Sakawarbai asks Vishwanath-bhat that Krishnaji Bhaskar, the maternal uncle of Abaji Sakhadeo had taken loan from her but he died. Hence his property, a house at Nagpur and other sundry articles will have to be attached and sold for the recovery of the money with the help of Raghuji. The money was advanced, as Abaji Sakhadeo had recommended to help him.

No. 26 श्रीसांबसिव भाद्रपद १६६९
सपटंबर १७४७

विनंती उपरी चिटी पा। ते पावली. कालचें वर्तमान कळावें हा आशये. यैसी यास काल रात्रौ श्रीमंत राजश्री **मुधोजीबावास** घेऊन दरबारास गेलों होतों. कितेक प्रकार बोलण्याचे बोलोन सेवटीं पक्षाकरितां **देऊरास** जाणें आगत्य लागतें, निरोप आज, हाच आग्रह असतां **मुख्यांनीं** उभयतांनीं बहुताप्रकारें समाधान केलें. निरोप देत नाहीं, दो रोजांत तुम्हांस परिछिन्न सांगतों, शंशये नाहीं. येसें म्हणोन वाटेस लाविलें. कळावें. यैवजाचा मार आपणासीं बोलिलों, आणि आपण बोलिला त्याप्रमाणें रा। **आपास** विदित केला. आज सारे दिवस वाट पाहिली. परंतु **रामचंद्रपंत** आले नाहींत. जर परिछिन्न कर्तव्य आहे, तरी प्रसंग रक्षावा. आजचे उद्यावर न टाकावें, म्हणजे सर्व प्रकार उभयपक्षीं उपयोगी आहेत. येथें तुम्हासिवाय कांहीं नाहीं. उतर पा। हे विनंती. कर्त (व्य) नसिलें अथवा शंशये आसिले तर परिछिन्न जाणवावें चिता नाहीं, हे विनंती.

---

(26) This letter confirms the Bakhar's mention of Shahu's desire to adopt as his heir Mudhoji Bhosle, son of Raghuji, born of his wife, who was a cousin sister of Shahu's Rani Sagunabai. Mudhoji, is here mentioned as having been brought of Satara for inspection in the Bhadrapad month of 1747, when in

the preceding Magh Raghuji is known to have visited Satara. Mudhoji wanted to go to Deur (near Wathar) for the anniversary but was detained for two days more by the King and his queen, when they promised to give their final decision. Raghuji who then possibly was at Deur and was trying for monetary help from the Vaidyas to whom the letter seems to have been addressed by one of Raghuji's agents. Appa must be Vithoji Naik Wakde and Ramchandrapant is probably Baburao Malhar Barwe. Both were bankers of Satara, cooperating with the Vaidyas.

———

No. 27 अश्वीन १६६९
सपटंबर १७१७

(पत्राचा वरील भाग नाहीं)

राजश्री **फत्तेसिंग भोसले** येथेंच आहेत. विचार मनसबा कांहीं नाहीं. राजश्री **बाबूजी नाईक** यांचा व **राजश्री मुरारजी घोरपडे** यांचा हर्गामर्ष जाहाला, त्यामुळें **बाबूजी नरगुंदीं** येथें राहिले. त्यास **सावनूरकर मोगल** व **मुरारजी** पाचसा हजार फौजेनिसी **बाहेर** × × दोन कोसावर येऊन राहिले, त्यास आठा पंधरा दिवसा त्यांची यांची झिडबीड होतच होती. त्यांस महाराज राजश्री **स्वामी कोलापूरवासी** येथें राहिले कीं, **बाबूजीनाा** आमचे **मुलुकांत** उपद्रव करितो, त्यांस **महाराजांहीं** आपणापासीं आणावें आणि आपले पायावर हात ठेऊन xxx कडे पाठवावे. xxxxx. बाहीर निघोन येतील त्याचे वाटेस न जाणें व तुम्ही उठोन आपल्या मुलुकांत जावें, **व याकडील** सरदार त्यांणीं धरिले आहेत ते समागमें घेऊन यावें. म्हणोन उभयतांकडून दोघेजण गेले. त्यांस **बाबूजीनाा** यांणीxxx **माहराजांस** सांगितलें कीं, आपण **नरगुंदाहून** येक मजल निघोन आलों, पुढें मजलदरमजल येतों. त्यावर राजश्री **कोलापुरवासी स्वामी** यांहीं येके दिवसीं उपोषण केलें व यांहींही केलें. साईकाळीं त्यांणीं सांगोन पाठविलें कीं, **बाबूनाा** याणें आमच्या मुलुकांत खंडाणियाकरून खतें घेऊन (**अपूर्ण**)

(27) The trouble that Babuji Naik was creating in the Karnatak, is well explained in this letter, referring to Murarrao Ghorpade, Sambhaji of Kolhapur and others. (See letters on page 330 in P. D. Vol. 26.)

No.28 श्री ५ शैवाल

आश्विन शुध ७, १६६९

सपटंबर २९, १७४७

श्रीयासह चिरंजीव विजईभव राजश्री **साबाजी भोसले** यांसी प्रति **रघोजी भोसले** सेनासाहेबसुभा आसिर्वाद. उपरी मामले **रामटेक** प्रां देवगड येथील फडनिविसी राजश्री **विसाजी रघुनाथ** वकील यांजकडे सालगुदस्तां सांगितली आहे, त्याप्रमाणें सालमजकुरीं करार असे. तरी यांचेतर्फेनं राजश्री **राघो बलाळ** यांसी पाठविलें असत, तरी यांचे हातें मामले मजकूरचे फडनिविसीचें कामकाज घेत जाणें, यांसी वेत [न] पेशजीचे सनदे + बमोजीब पावतें करणें. जाणिजे. छ ५ माहे शौवाल सुा समान आर्बैन मया आलफ. *हे आसिर्वाद. (मोर्तबसुद) मोर्तब अष्टकोनी दुरेघी.

* पुढील मजकूर रघूजीचे हातचा. + प्रमाणें

(28) Raghuji writes to Sabaji that as Vishwanathbhat Vaidya is to recover the revenue of Ramatek for the current year like the last one, his agent Ragho Balal Bhogale should be allowed to do the same and remuneration should be paid to him as before.

No.29 श्री छ १७ सवाल

आक्टोबर ११।१७४७

आश्विन वद्य ४, १६६९

राजश्री **बाळंभट** तथा राजश्री **विस्वनाथभट वैद्य** गोसावी यांसि

दा सकलगुणा अलंकारण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नों बुबाजी नाईक कदम नामजाद प्रांत किले गोपाळदुर्ग राम राम. विंनती उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें लेखन केलें पाहिजे. विशेष आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन कुशल वृत कळत नाहीं. तरी सर्वदा पत्र पाठवित असिलें पाहिजे. सांप्रत दरबारचें वृत्त कळत नाहीं, यास्तव तानजी नलवडे आपणाकडे कागद देऊन पाठविला असे. साकल्य वृत्त तत्वता लेहून पाठविलें पाहिजे. बहुत काये लिहिणें, लोभ असो दीजे. रा १७ सौवाल हे विनति. आपणाकडील कागदपत्र हुजूर जावयाचा असिला तर पाठऊन द्यावा. हुजूर रवाना करून. कळलें पाहिजे हे विनंति.

---

(29) Bubaji Naik Kadam, an officer in charge of the fort of Gopalgad sends Tanaji Nalawade to Vaidya brothers to know the news of Shahu's Darbar and assures to send to Angre the letters, addressed to him by them.

No. 30 श्री १५ जिलकाद

का. व. २।१६६९

शिक्का व मोर्तब अष्टकोनी दुरेघी नोव्हेंबर ८,१७४७

राजेश्री विश्वनाथ भट वैद्य गोसावी यासी.

दा अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रोंा रघोजी भोसले सेनासाहेब-सुभा दण्डवत. विनति उपरी येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष चाकरीचे रवारावर्सी हुजुरचे चोपदार राजश्री जिउराव मोहिते यांचे घरीं येऊन बैसले आहेत, म्हणोन कळों आलें.